वऱ्हाडसमाचाराची किंमत की०
वर्षाची आगाऊ रु० ६ डांकहशील ०।३
सहामाही " ३ " " ०।८
साल अखेर " ७ " " ०।८
किरकोळ अंकास........................०।४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।१।६
दुसरे खेपेस ........०।१

RS.
Per annum in advance 5 Postages 13a
Per annum in arrears 7 " 1R. 8a
Six monthly........... 3 " 6 as
Single copy............................ 4as

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXI AKOLA MONDAY 6 JUNE 1887 NO 22

वर्ष २१ अकोला सोमवार तारीख ६ माहे जून सन १८८७ इ० अंक २२

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ट वद्य १ शके १८०९.

## हिंदुस्थानांतील गव्हाची भावी स्थिति.

इंग्लंडदेश हिंदुस्थानपेक्षां कोणत्या ही दुसऱ्या रीतीनें महत्वाचा नसो परंतु आमची स्थिति पहातां इंग्लंडांतील कामकरी लोकांस अवश्य लागणारें धान्य ह्मणजे गहूं या संबंधाचें हिंदुस्थान देशाचें महत्व इंग्लंड देशास वाटण्यास कारण आहे. इंग्लंड देशानें व्यापाराचें तत्व स्वीकारलें आहे. तें असें कीं दोन देशामधील व्यापार खुला असावा ह्मणजे एका देशांतून दुसऱ्या देशांत येणाऱ्या वस्तूवर होताहोई तों पर्यंत कर घालूं नये व एका देशांतून दुसऱ्या देशांत जाण्यास कांहीं हरकत असूं नये. हें व्यापाराचें तत्व स्वीकारण्याचें कारण झालें म्हणजे तेथील जे राज्य धुरंधर लोक आहेत त्यांचा दीर्घ दृष्टी होय. इंग्लंड देशाचा सर्व मोठेपणा या देशाचे व्यापार बुद्धीवर व यांत्रिक कलेवर अवलंबून आहे हें आधी पूर्णपणें लक्षांत येऊ. देशांतील कामकरी लोकांत जेणें करून खाण्याचा मुख्य पदार्थ जो गहूं तो जितका स्वस्त मिळेल तितका चांगला जसजसा तो स्वस्त होईल तसतसा व्यापार वाढेल व उत्तम मजुरदार लोकांची पोटें भरतील अशी व्यवस्था ठेवणें त्यांस भाग पडेल व म्हणूनच हिंदुस्थानांतील गव्हावर कर न ठेवतां तो इंग्लंडचे लोक खुशालपणें आपले देशांत येऊं देत आहेत. अन्नासारखी अवश्य वस्तु मनुष्याचे जीविताला नाहींच व म्हणूनच अशी वस्तु जितक्या थोड्या दरानें इंग्लंडांत येऊन पडेल तितकें चांगलें अशी व्यापाराची व्यवस्था या खेरीज या देशांत दुसरा उपायच नव्हता. आज इंग्लंडांत जरी कोळशाच्या खाणी व लोखंडाच्या खाणी [illegible] व्यापार दृष्टीनें पाहिल्यास जरी फार [illegible]च्या आहेत तरी लोखंड किंवा कोळसे खाऊन निर्वाह तर होत नाहीं. व या प्रमाणानें पाहिलें तर आज इंग्लंड देशांतील कामकरी लोकांस जगविण्याचे किंवा मारण्याचें साधन आपले हातीं आहे हें उघड दिसतें [illegible]

युरोपखंडांतील बहुतेक सर्व देश सुधारण्याचे कामांत दिवसें दिवस पाऊल टाकीत आहेत व अशा वेळेस दिवसें दिवस वाढणाऱ्या राष्ट्रीय प्रजेस कोणत्या तजविजीनें भाकरी मिळेल या विषयीं काळजी वाहण्याचें काम देशोदेशचे धुरीण पुरुषाकडे आहेच. प्रजा तर दिवसेंदिवस वाढणार व जमीन तर पडली नियमीत यामुळें पुढें होणाऱ्या प्रजेसाठीं आज पासून तजवीज करण्याचें खटपटींत बहुतेक राष्ट्रें आहेतच. इंग्लंड देशाच्याही या संबंधानें खटपटी चालूं आहेतच. या तजविजी ह्मटल्या म्हणजे दोन प्रकारच्या आहेत एक वसाहती दुसऱ्या देशांत करणें व आपले देशांतले देशांत अगर परदेशांतून गहूं किंवा इतर खाण्याचे पदार्थ आणविणें. तूर्त आपणास दुसऱ्या तजविजी संबंधानें विचार करणें आहे; म्हणजे हिंदुस्थान देशांतून हजारों खंडी गहूं विलायतेस जातात या संबंधानें आपले देशास काय केलें पाहिजे या विषयीं विचार करणें भाग पडत चाललें आहे. व या संबंधानें विचार करण्या पूर्वी इंग्लंडांतील शेतांतील गहूं पेरणाऱ्या शेतकऱ्यांच्या ज्या अडचणी आहेत त्या थोडक्यांत विचार करूं. गेल्या दहा वर्षांत इंग्लंड देशांत सुमारें दहा लाख एकर जमीन पडीत पडली म्हणजे या जमिनींत पूर्वी गहूं पेरीत असून शेतकरी लोकांस दिवसें दिवस या जमिनींत फायदा राहिनासा झाल्यामुळें त्यांनी त्यांची लागवड करणें सोडून दिलें व इतकी जमीन नावाही त होऊन ती फक्त गुरें चारण्याच्या मात्र उपयोगी तूर्त बनली आहे. इंग्लंडांत एका एकरात सुमारें तीन पाउंड म्हणजे सुमारें ३० रुपये भाडें जमिनीचे मालकास द्यावें लागतें! या खेरीज जमिनीची लागवड करण्याचा खर्च सुमारें ८ पाउंड म्हणजे १०० रुपये प्रत्येक एकरास येतो! हे आकडे हिंदुस्थानांतील कोणत्याही शेतकऱ्यास खचित भेवडून टाकतील यांत संशय नाहीं. इतका खर्च लागूं लागला म्हणजे शेत वहीत करणारे शेतकरी यांस निवळ प्राप्ति ती काय होणार! या सर्व अडचणी मुळें पुष्कळ जमीन पडीत पडली असून वर लिहिलेली दहा लाख एकर जमीन आज दहा वर्षांत पडीत पडली! [illegible] सर्व प्रभाव इतर देशांतील गहूं स्वस्त दरानें इंग्लंडांत येऊन विकूं लागले याचा. व त्या मुळें तेथील महागाईनें गहूं घेतो कोण? इंग्लंड देशांत सुमारें [illegible] लाख क्वार्टर्स गहूं अमेरिका खंडांतील युनायटेड स्टेटस मधून सन १८८६ सालीं गेले व हिंदु[illegible] [illegible] लाख [illegible] टर्स

कांहीं गेले परंतु विलायतेत गव्हाचा जबरदस्त पुरवठा करणारें म्हटलें म्हणजे दोनच देश आहेत. हिंदुस्थान व अमेरिका. तेव्हां या दोन देशांतून गव्हाचा सारखा पुरवठा झाल्यानें इंग्लंडांतील उत्पन्न होणारे गहूं फार महाग पडूं लागले व या मुळेंच तेथील शेतकऱ्यांनीं जमिनी पडीत पाडल्या या प्रमाणें तेथील उत्पन्न होणाऱ्या गव्हाची स्थिति असल्या कारणानें आपणास आपल्या देशांतील गव्हाचे पिकासंबंधानें काय विचार केला पाहिजे हा प्रश्न साहाजिकच उत्पन्न होतो. कारण या देशास अतिशय मोठी उत्पन्नाची बाब ह्मणजे शेती. या देशाचे सर्व बरेवाईट हल्लींचे स्थितींत शेतीवर अवलंबून आहे या देशांत युरोपांतील देशाप्रमाणें यांत्रीक कलेचा प्रसार नसल्यामुळें व येथील लोक या प्रकारच्या कलेंत आज निपुण नसल्यामुळें आपलें उपजीविकेचें साधन शेतीच होत चाललीं आहे. आतां जों पर्यंत येथील उत्पन्न होणारें धान्य येथेंच खपत होतें तों पर्यंत फारसा विचार करणें अवश्य नव्हतें परंतु हेच गहूं आज दुसऱ्या देशी जाऊं लागल्यामुळें तितक्या प्रमाणानें येथील लोकांस खाण्यास कमी झाले व अर्थात त्याची किंमतही वाढली. दुसऱ्या देशांतून जे व्यापाराचे जिन्नस आपण या देशांत घेतो त्याच्या बदला त्या देशाला परत गहूं करावे लागतात व हिंदुस्थानसरकारास जें कर्ज आहे त्यासंबंधाचे व्याजाबद्दलही गव्हाच्याच रूपानें पैसा भरावा लागत आहे. तेव्हां गहूं व कापूस व इतर खाण्याचे पदार्थ इंग्लंड देशांत पाठवावे लागत असल्यामुळें त्यांचें उत्पन्नही जास्त जास्त होणें इष्ट आहे. या सर्व पदार्थांपैकीं गहूं हा पदार्थ खाण्याचा असल्यामुळें याविषयींचा विचार फारच महत्वाचा आहे. या देशांतील प्रजा सारखी वाढत चालली आहे व पुढें ही वाढतच जाण्याचा संभव आहे तेव्हां वाढत जाणाऱ्या प्रजेच्या पोटाची तजवीज काय या गोष्टीचा विचार आज पासूनच केला पाहिजे.

पुढें चालेल.

## दादाजी विरुद्ध रखमाबाई या खटल्यावरून सुचणारे विचार.

या खटल्याचा या देशांतील अखेरचा निकाल तर झाला व या खटल्यासंबंधीं अनेक प्रकारची बारीक अंतस्थ माहितीही अनेक द्वारांनीं लोकां[illegible] आतां ती माहि ती [illegible] संबंधानें प्रत्येक

व्यक्तीच्या निरनिराळ्या कल्पना होतील. हा खटला उपस्थित होण्याचें खरें कारण डा० किर्तीकर यांणीं नुकतेंच भाषण केलें त्यांत सांगितलें तें जर खोटें असेल तर रखमाबाई किंवा तिच्या पक्षीयांनीं त्याविषयीं खरी माहिती लोकांना देणें हें त्यांचें काम आहे. नुसतेंच हें सर्व खोटें आहे, मृत मनुष्याविषयीं वाईट गोष्टी बाहेर काढणें का हीं सज्जनपणाचें काम नाहीं व अशाच प्रकारच्या व्यर्थ जल्पना करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. रा० दादाजी यांनीं जें पत्रक प्रसिद्ध केलें आहे त्याजला सौभाग्यवती रखमाबाई यांनीं उत्तर देणें हे त्यांचें कर्तव्य कर्म असून त्यांनीं आजपर्यंत तसें केलें नाहीं. अशा वेळीं रखमाबाईनें स्वस्थ बसून राहणें हें उलटपक्षाला बळ येण्यास कारण होत आहे. तिच्या मित्रमंडळीनें जर तिला स्वस्थ बसण्यास सांगितलें असेल तर त्यांनीं फार वाईट केलें असें ह्मटलें पाहिजे. कारण यामुळें रा० दादाजींच्या ह्मणण्यास अधिक बळकटी येत चालली आहे वास्तविक खरी हकीकत कांहींही असो निवळ पैशाकरितां हा कज्जा उद्भवला असो अगर नसो त्या गोष्टीची आपणास जरूर नाहीं व तशी खरी हकीकतही लोकांस कळणें किंवा निदान लोकांस खरी आहे असें सिद्ध करून दाखविणें कठीण आहे परंतु एकंदर असें दिसून येतें कीं रखमाबाईच्या पक्षीयांनीं आपल्या पक्षाबद्दल मांडतांना दादाजींना नाहीं नाहीं ते वाईट शब्द लाविले आहेत त्यांच्याविषयीं नाना प्रकारचे कुतर्क घेतले आहेत व हरएक तऱ्हेनें त्याची जगांत नाचक्की होईल अशीं विशेषणें त्यास दिलीं आहेत. उलट पक्षानें यापैकीं कांहींही केलें नसून मात्र जेव्हां रखमाबाईच्या पक्षानें आपल्याचा बडिवार केला व लोकांना दादाजींचें या खटल्यांत वर्तन अगदीं निंद्य असें दाखविण्याचा होईल तितका यत्न केला तेव्हां त्याचें खंडन करण्या करितां व आपले निर्दोषत्व दाखविण्या करितां यत्न केला व तो बराच सफलही झाला असावा असें दिसतें. आतां हे सर्व विचार एकीकडे ठेवून आपल्या सामाजिक स्थितीचा या खटल्याशीं कित पत संबंध आहे तें पाहूं. हिंदुधर्मशास्त्राचे दृष्ट्या तर हा खटला दादाजींच्या तर्फेनें करून दिलाच अलीकडे बहिवाट कशी आहे तें पाहिलें तरी बडोदे इंदूर वगैरे संस्थानांतूनही अशाच प्रकारची वहिवाट आहे व योग्य कारणाशिवाय स्त्री नवऱ्याच्या घरीं नांदत नसल्यास तिला कैदेची शिक्षा तिकडेही लागूं आहे असें सिद्ध झालें आहे. कैदेची शिक्षा फार जबर आहे व या गोष्टींत आपल्या इच्छे विरुद्ध नवऱ्याच्या घरीं राहावें [illegible] नरी

नाहीं.व कैद हें शासन फार कठोर आहे असें वर्डस्वर्थ साहेब व इतर कांहीं विद्वान मंडळीला वाटून ह्या संबंधें कांहींतरी खटपट करावी एतदर्थ यांनीं एक कमिटी स्थापन केली आहे ही गोष्ट सर्वांना महसुरच आहे. पुष्कळ कोंवळ्या मनाच्या लोकांस फाशीची शिक्षा फार कठोर वाटते व ही शिक्षा कायद्यांत नसावी ह्मणून ह्यांची खटपट ही चालू आहे, त्यापैकींच हा प्रकार आहे. लग्न संबंधी स्थितींत हात न घालतां फक्त कैदेची शिक्षा नसावी या विषयींच खटपट करण्याचा या कमेटीनें बेत केली आहे हें उत्तम झालें. सामाजिक स्थिती मध्यें तशांत लग्ना सारख्या नाजुक गोष्टींत समाजमता विरुद्ध बळीजोरीनें फेरफार करूं पाहणें हें फार धोक्याचें काम आहे. बालविवाहाची चाल हिंदुस्थान देशांतच आहे असें नाहीं. हल्लीं सुधारलेले ह्मणविणाऱ्या देशांतच ही ज्यांना अमुक एक चाल वाईट आहे असें पूर्णपणें समजतें त्यांच्यानें सुद्धां आपल्या समजुती प्रमाणें निर्भिडपणें वर्तन घडत नाहीं असें असून आपल्या मनाच्या समजुतीप्रमाणें सर्व समाज नव्या धरतीवर रचूं पाहणें हें फार धाडसाचें काम आहे; तशांत या गोष्टींत परजाती यांनीं हात घालणें हें अगदीं अयोग्य आहे. आपल्या गृहस्थितींत कांहीं अयोग्य वाटल्या वरून जर एखादा परकी गृहस्थ आपणास त्यासंबंधीं उपदेश करील तर ते आपणास कितपत रुचेल बरें. याच प्रमाणें ही गोष्ट आहे. असें असतां मलबारी प्रभृती मंडळींनीं हिंदुलोकांची गृहस्थिती सुधारण्याचा एकसारखा यत्न चालविला आहे व या यत्नांत विचाऱ्या हिंदुलोकांची वाटेल तशी निंदा ही केली आहे. तेव्हां हिंदु समाजाला हे गृहस्थ व त्यांचा उपयोग आवडत नाहीं यांत कांहीं नवल नाहीं व अशा गृहस्थांच्या अशा उपयोगामुळें आमचे सुधारणेचे पाऊल उलटें मागें पडण्याचा संभव आहे निदान पुढें पाऊल जितकें लवकर पडलें असतें तितकें लवकर पडण्याला अडथळा आला आहे. आमचे मित्र ह्मणविणाऱ्या लोकांकडूनच आमचें यांत नुकसान होत आहे. लंडन टाइम्स मध्यें नुकतेंच एक ........या सहीचें पत्र छापिलें आहे प्राव्ही कौंसिलपर्यंत वरील खटला न्यावा अशी या गृहस्थाची सूचना आहे. या सुचनेप्रमाणें जर खटला पुढें गेला तर दोन्ही पक्षांचे पैशाच्या बाबतींत मात्र नुकसान आहे कांहीं केलें तरी ज्याअर्थीं ही चाल होती स्त्रीच्या मर्जीविरुद्ध किंवा तिचा कल न पाहतां तिचा विवाद करणें ही गोष्ट हिंदुस्थानांतच घडते व घडत होती असें नाहीं इतर सुधारलेल्या राष्ट्रांत ही अशा गोष्टी अनेक वेळां घडल्या आहेत व घडत ही असतील.परंतु एवढ्याच कारणानें अशा प्रकारचे सर्व विवाद बेकायदेशीर आहेत असें तेथें ठरले नाहीं तसें येथेंही ठरणें रास्त नाहीं. इतर करारांप्रमाणें लग्न ही कांहीं करार नाहीं असें सर्व देशांत आज पर्यंत मानीत आहे व मानतात असें [illegible] ह्मणजे केवळ इतर करारां पाहे [illegible] चाल त्यास हल्लींच्या समाज स्थितींत फार हानी होणार आहे. कोणत्याच प्रकारचा बंध राहणार नाहीं इतर करारांप्रमाणेंच विवाहाचें बंधन अस्थीर काणि मर्जीस वाटेल तेव्हां सुटण्यासारखें आहे असें एकदा ठरलें ह्मणजे पुष्कळ गोष्टींत स्थैर्य नाहींसें होऊन हरएक प्रकारें नुकसान होणार आहे. सुधारणेविषयीं अत्युत्सुक अशा कित्येक मंडळीस असें वाटतें कीं अमुक ऐकण्या झाल्याशिवाय लग्न झाल्यास ते कायदेशीर धरूं नये असें केल्यानें बालविवाहाची दुष्ट चाल बंद होईल. परंतु असें केल्यानें तूर्त किती नुकसान होणार आहे व किती लोकांच्या संसाराची माती होण्याचा संभव आहे हे त्यांच्या लक्षांत येत नाहीं. समाज स्थितींत फेरफार करणें तो फार बेताबातानें व हळु हळु झाला पाहिजे. चार पुढारी लोकांस वाटेल कीं अमुक एक चाल वाईट आहे ह्मणजे लगेच त्याप्रमाणें सर्वांना बळजबरीनें किंवा एकाएकीं ती चाल सोडा असें ह्मटलें तर कसें चालेल. आज आपली स्थिती अशी आहे कीं नवरा बायकोचे जे विदुष्ट पडले आहे त्यांत उलटी भरच पडणार. झाला हा निकाल फार चांगला आहे कारण क्षुल्लक कारणावरून नवऱ्याबरोबर नांदण्यास नाखुष अशा बायकांना पापासून थोडासा निबंध राहील. आतां मुलींचा [illegible] च्या मर्जीविरुद्ध विवाद करावा असें आमचें मुळींच ह्मणणें नाहीं परंतु चालींत जो फेरबदल करणें तो फार विचारानें व समाजाची स्थिती पाहून केला पाहिजे. सर्व वस्तुनां दोन जुं आहेत कोणती ही गोष्ट सर्वांशीं चांगली किंवा वाईट असें ह्मणतां येत नाहीं. देशकाल मानाकडे पाहून सर्व विचार केला पाहिजे;मानसिक सृष्टींत फेरफार करण्याचा नाहीं. ज्या हिंदुसमाजाच्या रितिभातींत आपण फेरफार करूं पाहतो तो समाज फार पुरातन आहे. ह्यांतील लोकांच्या मनावरचे ग्रह ह्मणजे नुसते चारपांच मिनिटें लिहिल्यानें किंवा नवे कायदे केल्यानें जाणार नाहींत. समजदार लोकांची संख्या सध्या फारच थोडी आहे व ह्यांच्यांत ही, सुधारणा अमक्याच प्रकारची व अमकीच आहे असें एकमतही दिसून येत नाहीं तर कायकरणें ते विचारानें व फार हळुहळु केलें पाहिजे.

## निजाम सरकार व त्यांचे अमीर.

निजाम सरकारचे मुलखांत मोठे अमीर, जाहागिरदार अनेक आहेत. त्यां पैकीं कांहीं खुद्द निजामसरकारचे गादीचे आरंभा पासून असतीलच. कारण ज्या मूळ पुरुषानें दिल्लीचे बादशाहा पासून भांडून निघून दक्षिणेंत स्वतंत्रराज्य स्थापिलें त्यास त्यावेळेस जे साथी होते व ज्यांणीं त्या पुरुषा[illegible] स्वातंत्र्य मिळविण्याचे कार्यांत सर्व प्रकारें कुमक केली असेल त्यांस जहागिरी वगैरे दिल्या असतीलच. कांहींस नंतर मिळाल्या असतील. परंतु एकंदरींत पाहातां नव्या किंवा जुन्या दिलेल्या असोत अनेक जहागि[illegible] वंशपरंपरेनें सांप्रत चालू आहेत हीं [illegible] वाचकांस ऐकून किंवां पाहून माहित असेलच. कांहीं जहागिरी सालीना लक्षावधि रुपये उत्पन्नाच्या आहेत. व हेमोठे जहागीर पुष्कळ दिवसां पासून चाललेले वहिवाटी प्रमाणें लहान लहान स्वतंत्र मांडलीक राजाप्रमाणें वागत आले आहेत. एकवार यांचा असा तनखा तोडून दिलेला आहे कीं, त्यांचा परस्परांशीं किंवां खुद निजाम सरकारांशीं तादृश अर्थाअर्थी संबंध मुळींच राहिलेला नाहीं म्हटले तरी चालेल. याबद्दल जाहागिर दारांकडून निजामसरकारास किंवा परस्परां कडून परस्परांस बाह्य मान देण्याघेण्याचा कांहीं ठरावकिंवां वहिवाट असल्यास त्या बद्दल आम्हांस विशेष माहिती नाहीं. परंतु उत्पन्न करणें, कर बसविणें, उठविणें, खर्च करणें, व सर्व प्रकारचे दिवाणी फौजदारी स्वरूपाचे अधिकार आपापल्या जाहागिरींत चालविणें या संबंधानें पहातां या जहागिरदारांचा परस्परांशीं किंवा निजाम सरकारांशीं जसा काय कांहींच संबंध नाहीं, प्रत्येकानें स्वच्छेनें पाहिजे तो व्यवस्था व वहिवाट करावी अशी स्थिति पुष्कळ दिवसांपासून चालूं असल्याचें समजतें.

ही स्थिती आज तागायत वरी चालली. म्हणजे बहुतेक जहागीरदारांचा किता एकच असल्यामुळें त्यांच्या रयतेच्या सोयी गैरसोयी सुखदुःखें व जहागिरदारांचे तोटे नफे बहुतेक अंशीं सारखें होतें त्यामुळें त्यांच्या मध्यें परस्परांत बरें वाईट वाटण्यास विशेष कारणें झाली नाहींत. परंतु अलीकडे भोंवतालचे मुलखांत इंग्रजी अंमल असल्यामुळें, शिवाय निजाम सरकारचे दरबारांत इंग्लिश वर्चस्व वाढत असल्यामुळें, शिवाय इंग्रजी व मोगलाई राज्यव्यवस्थेंत मोठा फरक असल्या मुळें पूर्वी प्रमाणें निजाम सरकार व जहागिरदार याचे संबंध बदलत चाललें आहेत, व परस्परांस परस्परांकडून नडी येऊं लागल्या आहेत व तेणें करून राज्य व्यवस्था व न्याय योग्य रितीनें काम चालण्यास नेहमी हरकती येतें आहेत. हे जहागिरदार व निजाम सरकार हे सर्व सारखें स्वतंत्र असल्यामुळें एकाचे नियम दुसऱ्यास लागू नाहींत व एकास दुसऱ्याचे कारभारांत हात घालतां येतें नाहीं. या जहागिरी आणि खुद निजाम सरकारचा खालसा मुलुख एकांत एक गुरपटल्या सारखें असल्यामुळें बदमाशी लोकांस एयेच्छ संधि सांपडते आणि गुन्हेगारास योग्य शासन होऊं शकत नाहीं. एका जहागिरींत गुन्हा करावा आणि गुन्हेगारांनीं शेजारचे जहागिरींत किंवा खालसा मुलखांत छपून रहावें. ज्याचे हद्दींत गुन्हा झाला त्या जहागिरदारास शेजारचे जहागिरीचे हद्दींत जातां येत नाहीं. व गुन्हेगाराचा पाठलाग करतां येत नाहीं दुसऱ्या जहागिरदाकडे दाद लागून त्याजकडून मदत मिळेपावेतों गुन्हेगारांस गुन्ह्याचा मागमोस अगदीं नाहींसा करण्यास वेळ सांपडतो. शिवाय एका जहागिरींतील गुन्हेगार दुसरींत गेले गुन्हेगारास पकडून ज्याचे हद्दींत गुन्हा झाला असतां जहागिरा[illegible] स्वाधीन करतात. [illegible] संबंधानें [illegible] हेत असें आम्हास वाटत नाहीं व असेल्यास अंमलबारी होते नाहीं.

निजाम सरकारचा खालसा मुलुख व जहागिरी यांत एक सारखी व्यवस्था रहावी ती सुरळीत चालावी व तेणेंकरून रयतेस सुख व्हावें.जुलूम जबरदस्ती होईल तितकी कमी करावी या हेतूनें कांहीं तजवीज योजण्या बद्दल हैदराबाद सरकारचा फार दिवसां पासून विचार चालूं आहे. तो विचार हा कीं, जहागिरदारांस जो हल्लीं सर्व प्रकारचा दिवाणी फौजदारी अखत्यार आहे तो अजी काढून घेऊन तें सर्व काम निजाम सरकारानें आपले हातीं घ्यावें व त्या सरकारचे खालसा मुलखा प्रमाणें जहागिरींत वहिवाट ठेवावी. मात्र जहागिरीचें उत्पन्न जहागिरदारांनीं घ्यावें, उत्पन्न घेण्या वांचून इतर प्रकारचा त्यांचा राज्य व्यवस्थेशीं संबंध ठेवूं नये. या हेतूनें अशा प्रकारचा ठराव पाहिले सर सालरजंग दिवाण यांचे वेळेस झाला होता. परंतु त्या वेळेचे नवाब साहेबांनीं दिवाणाचें आग्रहास्तव जरी आपली संमति दिली होती तरी ती गोष्ट त्यांस अंतःकरणांतून करण्याची नव्हती ह्मणून बाह्यतः मंजुरात दिली असून ही या पक्षाविरुद्ध जाहागिरदारांस नवाब साहेब आंतून अनुकूल राहिल्यानें वरील ठराव अमलांत न येतां पूर्वींचीच स्थिति आज तागायत कायम राहिली.

मुंबई ग्याझेट पत्रावरून आतां समजतें कीं या प्रकरणाची पुन्हा उठावणी होऊन जाहागीरदारांकडील दिवाणी फौजदारी अधिकार काढून ते आपले हातीं घेण्याबद्दलचा ठराव निझाम सरकारानें नुकताच केला आहे. या ठरावाची कलमें अजून प्रसिद्ध झाली नाहींत. हा ठराव फार महत्वाचा आहे यांत संशय नाहीं. हल्लीं जबरदस्त असा कोणी दिवाण हैदराबाद दरबारांत नाहीं; खुद निझाम सरकार अद्यापि अल्पवयीच आहेत; ह्यांचे खानगी सल्लाकार हिंदुस्थान सरकारानें नेमलेले आहेत व वरसांगितलेली व्यवस्था होणें निझाम सरकारचे राज्यास हितावह व इंग्रज सरकारास इष्ट आहे. तेव्हां या महत्कार्यास सांप्रत प्रसंगाप्रमाणें पूर्वी कधींच इतकी सर्वांशी अनुकूल संधी आलेली नसेल. व ही गोष्ट सिद्धीस जाईल तर फार चांगलें असें आम्हां तिऱ्हाइतांस वाटतें.

या योज्या सुधारणेस जाहागीरदार सर्वांशी अनुकूल नसतीलचें हे ह्मणून दाखविण्यास नको. वंशपरंपरेचे हक्क जहागीरदार सुखानें सोडतील असें नाहीं. करितां या कार्यांत अनेक अडचणी येण्याचा संभव आहे ही गोष्ट इंग्लिश सरकारचें संमतीनें व मदतीनें झाली तर होणार आहे. व ज्या अर्थीं इंग्लिश सरकारची संमति आहे व मदत ही मिळेल त्याअर्थीं ती अखेरीस सिद्धीस जाईल यांत आह्मांस संशय वाटत नाहीं. या कार्यांत येण्यासारख्या सर्व अडचणींचा पुरा विचार झाल्यावांचून या या कार्यास आरंभ झाला नसेलच. वर दर्शविलेला ठराव फार महत्वाचा व फार योग्य व सर्वांस इष्ट आहे ही गोष्ट खरी; तथापि जहागिरदारांच्या वंशपरंपरेचे हक्कांचा [illegible] मागील [illegible]

विचार करतां आह्मांस वाटतें कीं ही गोष्ट एकावट हुकुमानें करूं पाहिल्यास नड ना ईल पण मुख्य मुद्यावर नजर ठेवून हें कार्य हळूहळू होण्याबद्दल तजवीज केल्यानें कालांतरानें साध्य आहे.


# The Berar Samachar

MONDAY JUNE 6 1887.


A correspondent of the Times of India calls its attention to the tactics of the voice of India. Its promoters succeeded, it is alleged, in bringing about a union among the native journalists and the result of it was the silence observed by that Press on the Ahmedabad libel case. What reasons led to the correspondent to form such a notion, it is not possible to guess. But the coming into existence of the "Voice of India" has been distasteful to some Englishmen and they have from the first anticipated a dark cloud from the action of that Magazine. It may be that the correspondent thought the silence of the native Press due to the fact that if extracts came into the Voice of India the circulation of the opinions of the Native Press would be wide and become known largely in England and thereby the English would be able to form an opinion of the merits of native criticism. We do not suppose that the papers have been silent, if they are so, from a motive. But it is an open fact that if one cares to detect a system and draw upon inferential reasoning any set of facts will be sufficient for him to draw conclusions which never entered the heads of those who took part in the occurrence in which the facts were given out; or who were the authors or the direct parties to these facts. It is a very pleasant occupation for those who have little else to do but who yet indulge in abstract and inferential reasoning to place before them a set of facts promiscuously and proceed to found upon them dazzling and plausible conclusions. For we attribute to the over zealousness of the correspondent in detecting a fault in the promoters of the voice of India than to any thing else the discovery of the fact that the silence of the native press on the case is studied and is directed by the influenceof the Magazine.

---

We give, here, in brife, the result of the measures adopted in the H. A. D. for the destruction of wild animals and venomous snakes during 1886.

15 persons and 1583 cattle were killed by wild animals in 1886 against 21 persons and 2085 cattle in 1885. 214 persons and 130 cattle were killed by snakes during the past year against 206 persons and 192 cattle in the previous year.

The number of human beings killed increased by two, the deaths caused by wild animals having fallen from 21 to 15 and those caused by snakes having risen from 206 to 214. Of the 15 deaths said to be caused by wild animals, tigers caused 3, leopards and pa he s, 5, bears, 1, wolves 3 and other animals 3.

[illegible] loss of cattle by wild animals and snakes ammounted to 1713, which shows a decrease 564 over the figures of the previous year. Tigers, leopards and wolves were most destructive a they alone killed 15 21 cattle.

252 wild animals and 496 snakes were destroyed during 1886 against 382 wild animals and 744 snakes in 1885; and Rs. 2261- 8 and 88-10 were paid in rewards for the destruction of wild animals and snakes respectively during the past year against 3287- 8 and 127 in the previous yeer.

The number of wild beasts destroyed decreased by 130. The number of tigers killed fell from 34 to 17, leopards from 128 to 94 and of wolves from 109 to 70. Also the number of snakes destroyed decreased by 248. The amount paid in rewards in 1886 was also less than in 1885.

In these results it is gratifying to notice that the loss of both human life and cattle by wild animals was less in the past year than in the previous year. It is however discouraging to find that the number of wild animals and snakes destroyed was considerably less and that consequently the amount paid in rewards was also less.

2471 Licenses to carry arms granted for the protection of crops and destruction of wild animals in previous years were in force, and 1037 more were granted during 1886. It is not clear how many licenses were granted to sportsmen and how many to cultivators whose chief object in obtaining such licenses is only to protect their crops. However it appears that applications for licenses are not rejected without grounds and that thus rejection of applications for licenses is not an impediment in the way of destruction of wild animals to which sufficient encouragement is given by offering liberal rewards.

---

The appointment of Mr P. M. Mehta o the legislative council of Bombay has given general satisfaction. His high reputation as a barrister, his powerful oratory and the diligence and Industry which he brings to bear upon the subjects he handles will be of especial advantage in the Legislative Council. A sound knowledge of law may be said to be the sine qua non of a member of the Legislative Council. It is on this account that legal practitioners are a valuable accession to the Council. We must congratulate Lord Reay on the excellent selections he has made to the legislative Council since his arrival into this country. He has endeared himself to Bombay by the liberality of his policy, the suavity of his manners and the easy access he allows to men who come to visit him. He has become a very popular Governor and with all that the people entertain a very high opinion of his talents and abilities.

---

Here is a bit of news for the native papers and for us among the number. It is the estimate formed of the matter contained in them by a correspondent to the 'Times of India' who is evidently out of sympathy with the natives and appears to be a non-native. We have only to cry 'shorne' when we find the native journalist so grossly misrepresented.

Black sheep there are all over the world at the helm of a portion of the press, but the number of such sheep in the mofussil vernacular press is remarkable. With little or no education with antecedents th[illegible] scarcely bear the [illegible] no ov[illegible] abund[illegible] to [illegible] on a respectable paper, or of generous and accomodating friends, or of compe tent and conscientions contributors, some of the *soi-disant* editors eke out a precarious livelihood, passing the merest jargon, unreliable "news" obsene or indecorous paragraphs, and local hits of, at best, mediocre merit, as the *summmu bonum* of "matter" for their so-called papers. By ministerfng to the vilest tastes of readers of a certain class, such editors seek to swell the list of their subscribers, and thus not only disseminate low ideas into the minds of a certain class of readers but also keep out, as almost a necessary corollary, other deserviug and respectable papers of their reach.

Those, therefore, who directly or indirectly contribute their time, trouble money and influence towards the weeding out of, some at least, of such papers, may be said to be doing a public and signal service to the cause of morality and spreading a higher sense of decency aud refinement among the "teemfng millions" of the mofussil.

---

To
The Editor of the Berar Samachar.
Sir,

Will you be kind enough to give publicity to the following curious incident which has lately occurred in the Jalgaon Talook and which will long be remembered in the annals of the history of Berar? I hope that you will kinply spare some space in the columns of your beautiful Journal and will not throw this letter in the waste-paper basket.

In tne month of April 1887 8 Mahars performing the duty of Thuggs appeared in the Jalgaon Taluk and they declared themselves to be proficient in the art of magic and promised the public that they could double any amount of rupees within the time prescribed by them, and thus their company set on foot. The Mahars first opened a shop at Bhillkheir and rapidly spread its branches at Jalgaon, Tamgaon, Kherda, Taroda and Wadsingi. People being seized with a sort of madness flocked round these shops from all the quarters of the Taluk and invested large amounts of money and thus the company flourished. At first the company showed a great profit to its tenants but at last the bubbles burst and thousands of poor families have been reduced to beggary. Some poor widows and private women without the knowledge of their husbands pawned their jewles and ornaments and paid their money across the counter and received from the occountant of the company pieces of paper which they fondly believed would secure to them the possession of two-fold riches, but to their great surprise they within the space of a very short time became ruined bankrupts. The whole loss is approximately amounted to rupees two lacks. Police investigation is going on in great promptness and some of the culprits are under arrest. It is hoped that Oclonel F. W. Grant the Deputy Commissioner will take a very severe notice of this matter and do justice to the public.

Yours
X.

---

## वऱ्हाड

हवामान:—हवेंत उष्णता फार आहे. आकाश ढगांनीं आच्छादित असतें. आसपास कित्येक गांवीं हवेचा उपद्रव आहे असें म्हणतात.

---

[illegible] गांव [illegible] फ० मागील [illegible] आठवड्यांत नरनाल्याहून येथें येऊन परत गेलें.

नळगांव तालुक्यांत कित्येक गांवीं कः हीं माहार वगैरे लोकांनीं आह्मी कांहींएक प्रकारच्या सामर्थ्यानें रुपये एकदम दुपटीनें वाढवितों व ज्याचे त्यास परत देतों असें सांगून बरेंच लोकांपासुन पुष्कळसे पैसे घेतले. गरीबगुरीब ज्यांनीं पाहिल्यानें दहादहा वीसवीस रुपये आपणास तें दुप्पट होऊन मिळतील या आशेनें त्यांचें स्वाधीन केले त्यास त्यांनीं आपला लोकांस विश्वास यावा ह्मणून वीसवीस चाळीसचाळीस रुपये परत दिले, व असें करून आपल्यावर धन लोभी लोकांची पूर्ण भक्ति जडवून घेतली. नंतर ते कोण्या विचाराचे श्रीमानव द्रव्य लोभी त्यांनीं या लोकांना मोठमोठ्या रकमा दुपटीनें वाढविण्याकारितां आणून दिल्या. लोकास रुपये दुपटीनें परत मिळवयाचे ते लवकरच मिळेनासे होऊं लागले. तथापि या माहारांनीं आपला धंदा इतका नारीनें चालविला कीं ते केवळ ठक आहेत असें लोकांस कळण्यापूर्वी त्यांनीं सरासरी दोन अडीच लाख रुपयें मिळविले असावेत असा अजमास आहे. शेवटीं ही सारी लबाडी बाहेर येऊन कित्येक ठिकाणीं दंगेही झाले असें ह्मणतात. व पैशाचे संबंधानें बरेंच लोक येथें सरकारांत गाऱ्हाणीं करीत आले आहेत.

वरील सारी हकीकत खरी असल्यास फारच आश्चर्य आहे. प्रत्येक गावांत पाटील व बहुतेक ठिकाणीं पोलिसांची ठाणीं असून असे धंदे सतत कांहीं थोडे दिवस निर्भयपणें चालणें ह्मणजे फार नवल आहे. गावांत जर कोणी नवीन गोसावी किंवा दुसरे कोणी संशय येण्यासारखें लोक आले तर त्यांची लागलीच गावचे पाटील किंवा पोलीस ते बारकाइने कोण वगैरे चौकशी करतात, व हे महार लोक सुमारें तीन आठवडे हा धंदा करीत कित्येक गावांत हिंडत होते असें ह्मणतात पण त्यांचा शोध त्यांना इतके दिवस लागला नाहीं हे कसें! सरकार बारकाईनें चौकशी करून यांत खरें काय ते काढून अपराध्यांस शिक्षा देईल व ज्या सरकारी कामदारांच्या सुस्तीमुळें या अपराध्यांना हें कृत्य निर्भयपणें करण्यास सवड मिळाली त्यांसही योग्य शासन देईल अशी आमची पूर्ण आशा आहे.

पंडित सुरजनारायण यांस वाशीमास आक्टिंग असि० क० नेमलें.

---

रा० रा० अंबादास संतो ए० अ० क० यांस फर्स्ट क्लास म्याजि० चे व फिफ्थग्रेड सब० जज्जचे अधिकार दिले.

असिस्टंट आपाधिकारी मि० डब्ल्यू० इ. हेट्किस यांस उमरावतीस असिस्टन्ट सिव्हिल सर्जन नेमून असि० आपा० मि. डब्ल्यू. जे० मांटगामरी यांस एलिचपुरास त्यांचे जागीं नेमलें.

---

## वर्तमानसार.

सुरतच्या [illegible] पोलिटीनें [illegible]

ज्युबिली उत्सवास इकडील पत्रकर्त्यांस आमंत्रणें पाठवून फुकट विलायतेस न्यावें असें एकजण सुचवितो.

प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटांचा पगार यापुढें दोन दोनशें रुपयांनीं कमी करण्याचा सरकारचा ठराव झाला.

पारिस येथें एक नाटक चाललें असतां थियेटर जळालें त्यांत २० नाटकवाले जळून मेले. प्रेक्षक सर्व खुशाल आहेत.

सरकारी नोकरीस २१ वर्षांची अट आहे. पण यापुढें ज्युडिशियल खात्यांत ती अट लागू नसून ३० वर्षांपर्यंत सरकारानें मुदत वाढविल्याचें कळतें.

प्रसिद्ध मिस्तर विस्मार्क हे रोज ७९ ग्लासदारू पितात असें एका पत्रांत लिहिलें आहे! हें समजणीय असेल तर आमच्या लोकांनींही राजकारस्थानी बनण्यास आपलें आताचें स्केल जरा वाढतें धरलें पाहिजे!!

वाघ १० मिनिटांत आपलें पोट भरतो, पण नेत्रांत पोट भरण्यास ६ तास लागतात. यावरून वनस्पतींचा आहार बलद असून थोडा पुरतो. असें अनुमान निघतें आमच्या सुधारकांनीं आतां त्वरा करून आपल्या जेवणाचा वेळ वाचवावा.

कऱ्हाड—येथें एका तेल्यानें आपल्या मुलाचें लग्न केलें. त्यांत मुलाचें वय ९।१० महिन्याचें आहे व मुलीचें वय २।४ महिन्याचें आहे, हा विवाह झालेला ऐकून बालविवाह निषेध म्हणणाऱ्याचे नेत्र जाग्यावर राहतील काय! वि०

बेअब्रूस हांडविलें— मुंबई येथील कोणा एका देशी वैद्यानें आपल्या औषधी गोळ्यांबरोबर कांहीं बनिस्त हांडविलें वाटल्या वरून डिटेक्टिव्ह पोलिसानें त्यास पकडून आणिलें. मि० क्राफर्ड चोरो यांज समोर उभे केलें. आरोपीनें अशीं हांडविलें न वाटलीं अशा विषयीं आपणास माहिती नव्हती असें कळविलें. तथापि त्यास २०० रुपये दंड अथवा तीन महिन्याची सक्तकैद या प्रमाणें शिक्षा झाली.

कोल्हापुरच्या महाराजांनीं राणी सरकारास नजर करण्याकरितां बरेंच जवाहिर विलायतेस जातांना बरोबर नेलें आहे. पण मध्यंतरीं आगबोट बुडल्यामुळें तें जवाहीर ही बुडालें होतें, पण आमची महाराणी पुरी भाग्यवान असल्यामुळें तें बुडालेलें जवाहिरही समुद्रानें माघारें दिलें. यावरून राणीच्या भाग्याची परीक्षा होते असें सुबोधपत्रीकते म्हणतात. आम्ही म्हणतों अशी राणी जर आपली स्वामिणी आहे तर आपणही भाग्यवानच आहों. मात्र आपल्या जवळ द्रव्य नाहीं! तथापि आपण आपल्या बायका साहेब लोकांस देऊन टाकल्या म्हणजे कनक कांता ही कीं साध्या भाग्यवानांची चिन्हे तीं जाऊन आपण खरें वैराग्य भाग्यशाली बनूं!!

पु० बै०

करमाळे तालुक्यांत केम येथें गेल्या बुधवारीं सुमारें ५० दरवडेखोरांनीं एक [illegible] नी ढगली ब[illegible]र घातल्या असून [illegible] मात्र [illegible] त्यां पैकीं तेथें एक कोर्टाचा बेलिफ होता त्यानें दरवडेखोर आले असें पाहून तो गावांतील लोकांस जागे करूं लागला असतां दरवडेखोरांनीं त्यास हत्यारांनीं भोसकिलें व तेथील माणिकचंद गुलजाराम नांवाच्या गुजरा पासून सुमारें १२००।१३०० रु. चा माल नेला असें कल्पतरू वरून समजतें.

काशी येथें पुनः महामारीची साथ पूर्वीवत उद्भवल्याचें समजतें.

ज्याप्रमाणें मोठ मोठीं अक्षरें लांकडावर करून त्यांचें टाइप करतात त्या नमुन्याचें अमेरिकेंत कागदाचें टाइप करूं लागले असें म्हणतात.

महाभारताचे आजपर्यंत ३० भागाचे इंग्रजी भाषांतर होऊन तें छापलें गेलें त्याच्या खर्चाच्या साह्यार्थ स्टेट सेक्रेटरीनें १००० रु. हिंदुस्थान सरकारानें ११००० रु. व एतद्देशीय संस्थानिकांनीं १३४७९ रु. दिल्याचें समजतें.

क्यान्टोनमेंट माजिस्ट्रेटच्या अधिकारावर एक मनुष्य पांच वर्षांपेक्षा अधिक दिवस ठेवावयाचा नाहीं असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला असें म्हणतात.

रोगियास थंड पाणीच चांगलें ही गोष्ट खरी, तरी त्यांत नुसतां थोडा लिंबाचारस मिळून तें त्यास संथपणानें पिऊं देणें हें विशेष हितकारक होतें असें फ्रान्समधील एका वैद्यकीविषयीं प्रमुख वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

ग्वाल्हेरच्या तरुण महाराजांस त्यांच्या वडिलाप्रमाणें इंग्रज सरकारची एखादी आनररी लष्करी पदवी मिळेल असें म्हणतात.

इजिप्तच्या संबंधानें युरोपांतील प्रमुख राष्ट्रांचा असा ठराव प्रसिद्ध झाला आहे कीं इजिप्तांतून इंग्रजसरकारानें तीन वर्षांत आपलें लष्कर काढून न्यावें व तेथें पुनः दंगा धोपा झाल्यास पूर्वीच्या कराराप्रमाणें टर्कीनें व इंग्लंडानें स्वतंत्रपणानें किंवा एक विचारानें तो देश आपल्या ताब्यांत घ्यावा. त्या संबंधांत दुसऱ्यानें हात घालूं नये.

कराची येथील २६ व्या पलटणींतील एक शिपाई आपली बंदूक व दारूगोळ्या घेऊन बाहेर निघाला त्यास वाटेंत दोन शिपाई भेटले त्यांस त्यानें ठार मारलें नंतर बाजारांत जाऊन चार वाण्यास गोळ्या घालून मारलें याशिवाय दुसऱ्या पांच गाडीवानांस ठार केलें अशी ११ मनुष्यें ठार करून शेवटीं आपणास गोळी मारून घेऊन आत्महत्या केली असें समजतें.

हिंदुस्थानांतून ब्रह्मदेशांत आठवड्यांतून दोन वेळ डाक आणण्या नेण्याची व्यवस्था झाली.

जी. आय. पी. व ई. आय. या दोन कंपनीच्या दर्म्यान सामान आणण्या नेण्याचा करार झाला. सु० प०

होशारपूर म्युनिसिपालिटीचा अधिकार सरकारानें काढून घेतला. त्याचीं कारणें सर्व म्युनिसिपालिट्यांनीं लक्षांत ठेवावीं. एका हिंदूनें म्युनिसिपालिटीचा बोळ व त्या हद्दींत असणा[illegible] विहीर आपली म्हणून उपटली. हे [illegible] प्रपं[illegible] गोष्ट कमिटींत झाला. परंतु हिंदु सभासदांनीं बहुमत करून त्या जागेशेजारीं देऊळ बांधलें आहे म्हणून जागा परत घेऊं नये असें ठरविलें. ह्या निकालाचा पुनः विचार करा असें सरकारांतून लिहून आलें, तथापि त्यांनीं आपला हट्ट सोडला नाहीं. सरकारानें त्या मनुष्यावर दिवाणींत फिर्याद केली; परंतु त्यालाही आंतून हे लोक हरकत आणीत. मोहरमांत व दसऱ्याचे दिवसांत झालेल्या दंग्याचा बंदोबस्त ठेवला नाहीं व कमिटींतील मुसलमान सभासदाचे कांहीं चालेना म्हणून त्यांनीं राजीनामे दिले. या सर्व कारणांकरितां स्थानिक स्वराज्याचा अधिकार चालविण्यास हे लोक नालायक असें ठरवून त्याचा अधिकार सर चार्लस अचिसन यांणीं हिसकावून घेतला.

सालरजंग मुख्य प्रधान असतां त्यांचें व निजाम सरकाराचें पटेना, म्हणून स्नेहभाव घडून आणण्याकरितां कर्नल मार्शल यांची हैद्राबादचे दरबारीं योजना झाली होती तें कारण आतां नाहींसें झालें. अर्थातच कर्नल मार्शल ह्यांनाही हैद्राबाद दरबारीं ठेवण्याचें प्रयोजन नाहीं नवाब वुशीर उद्दौला आपले कामावर रुजू होतांच कर्नल मार्शल यास सरकारानें परत बोलवावें हें योग्य आहे. व०

बंगाल इलाख्यांत टपाल खात्यांतील बऱ्याच दूषणीय गोष्टी उघडकीस आल्या आहेत, व त्या बद्दल सरकारानें त्या खात्याच्या अधिकाऱ्यांस तपसिलवार जबाबही विचारले आहेत असें समजतें. ते जबाब सरकारास होतील तितके समाधान कारक व्हावे म्हणून त्या गोष्टीं संबंधीं माहिती मिळविण्याचें काम चालूं आहे. पण विशेषेंकरून ही कीं, हुशार व अनुभविक नेटिव कामदाराचे हक्क मारून त्याच्यावर कामास नालायक अशा खात्याच्या बाहेरील युरोपियनांस नेमणें व हातां खालच्या बऱ्याच्या प्रतीच्या पुष्कळशा जागांवर मुख्य मुख्य अधिकाऱ्यांच्या मुलाच्या, जावयाच्या आणि इतर नातेवाईकांच्या नेमणुका करणें अशा गोष्टींच्या संबंधानें योग्य जबाब कसे देता येतील ते पहावेत.

---

नोटीस.

रा० रा० रामजी वल्लद परशराम पाटील रहाणार तांबोडे तालुके आकोले यांस खालीं सही करणार यांज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही आमचे खात्याचे मळ खंडी व बादलापूर वाटेचें शेत यांत आपला हिस्सा कोणचे ही प्रकारानें नसून तुम्ही तें गहाण करून दिलें आहे व हिस्सा आहे असें म्हणतां त्यास नोटीसीनें असें कळवितों कीं तुमचा आमचे कोणते ही शेतांत हिस्सा वगैरे कांहीं नाहीं तुम्ही दगलबाजीनें गहाण करून दिलें तर नोटीसीनें असें कळवितो कीं, तुम्हास व गहाणदारास आमचे शेतांत येऊं देणार नाहीं. जर तुम्ही आला तर त्याजबद्दल जें कांहीं नफा नुकसान होईल तें तुमचे पासून भरून घेतलें जाईल कळावें.

तारीख [illegible] मे [illegible] १८८७ इ.

पाटील रहाणार ताकोडे निशाणी खुद.

---

नोटीस.

सावजी वल्लद माधाजी माळी राहाणार मानकी तालुके बाळापूर यांस खालीं सही करणार यांज कडून कळविण्यांत येतें कीं, मीं तुम्हास माझ्या शेताच्या कामा बद्दल कर्ज रुपये १२६ मागितले त्याप्रमाणें तुम्ही रुपये देतो कागद करून द्या म्हणून मागितले त्या प्रमाणें कागद करून घेऊन मजला एक पैसाही दिला नाहीं. व कागद करून घेऊन रुपये न देतां कागद तसाच ठेवून घेतला यांज बद्दल कीं पाहिजे तर योग्य पुरावा मी देईन आतां असें कळवितों कीं सदरील कागदा बद्दल कोणत्या ही प्रकारचा मीं जबाबदार नाहीं. व मी तुमचे कांहीं देणें नाहीं कागद पोकळ आहेत कळावें तारीख ३० माहे मे सन १८८७ इसवी.

(सही)

सखाराम वल्लद भीवतन पाटील खामखेड तालुके बाळापूर.

---

जाहिरात.

सर्व लोकांस खालीं सही करणार यांज कडून असें कळविलें जातें कीं आमची शेतें मळखंडी व बादलापूर वाटेची वगैरे शेतें किंवा यांतील भाग कोणी गहाण करून घेऊं नये व त्याजवर कर्ज देऊं नये जर करिता कोणी गहाण वगैरे घेतले तर त्याबद्दलचे पैशाबद्दल आम्ही कोणत्याही प्रकारचे जबाबदार नाहीं. कळावे तारीख ३० माहे मे सन १८८७ इसवी.

सही

रंगू वल्लद हरी पाटील राहणार ताकोडे

---

नोटीस.

रा. रा. सदोबा वाणी राहणार अकोले यास खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं, आमचे खात्याचे मळखंडी बादलापुरवाटेचीं शेतें तुम्हीं रामजी वल्लद परशराम पाटील राहणार ताकोडे यांजपासून गहाण करून घेत आहां. यांजकरितां तुम्हास असें कळविलें जातें कीं रामजी वल्लद परशराम याचे आमच्या कोणत्याही शेतांत बिलकुल संबंध नाहीं व जें शेत गहाण तुम्हास तो देत आहे तें आमचें आहे. तर तुम्हीं आमचे मान्यते शिवाय गहाण घ्याल तर त्याजबद्दल जबाबदार कोणत्या प्रकारानें आम्ही नाहीं. व त्याजबद्दल तुम्हांस विनाकारण जी दलल होईल त्याबद्दलचें नुकसान वगैरे सर्व तुम्हापासून घेतलें जाईल. व आणखी असेंही कळवितों कीं तुम्ही शेतांत याल तर आम्ही हाकालून देऊं कळावे ता० ३० माहे मे सन १८८७ इसवी.

(सही) रंगू वल्लद हरी पाटील राहणार ताकोडे निशाणी खुद.

---

☞ हें पत्र अकोला येथें [illegible] खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव [illegible] प्र० केलें.

वर्षाचीं आगाऊ रु० ५ डाकहशील ०।१२
साहत्माही " ३ " " ०।८
साल अखेर " ७ " " १।०८
किरकोळ अंकास..................०।४....

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।१।०६
दुसरे खेपेस ........०।१

Per annum in advance 5 Postages 10a
Per annum in arrears 7 " 1R. 8 a
Six monthly.............. 3 " 8 as
Single copy.................................... 4as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3as

VOL XXI AKOLA MONDAY 13 JUNE 1887 NO 23
वर्ष २१ अकोला सोमवार तारीख १३ माहे जून सन १८८७ इ० अंक २३

### नोटीस.

सरदारसिंग वल्द धनसिंग जमादार रहाणार पातूर सेखबाबू हल्लीं मुक्काम जिल्हा धाराशीव इलाखा मोगलाई सवारान कोतवाली डफेदार यांसी खालीं सही करणार याजकडून:—

नोटीस देण्यांत येतें कीं, तुम्ही व मी आणि उमरावसिंग असें साक्षात बंधु असून आपला बाप धनसिंग हे मरण पावल्या नंतर, जी बापाच्या हातची स्थावर, जंगम, रोकड, डागडागिनें, अशी इस्टेट होती. ती तिघांनीं सारखी वाटून घ्यावी, असें कायदेशीर हक्क व स्थिति असतां तुम्ही आणि दुसरें लोकांनीं मला फौजदारी मोकदम्याची दहशत घातली शिवाय तुम्ही जिनगीचे बाबतींत माझा गैरसमना विशी व कपटाचा प्रकार करून तारीख २२ माहे फेब्रुवारि सन १८८७ इसवी रोजीं एक वाटणी पत्र व एक पावती लिहून घेतली आहे. आतां तुम्हास या नोटीशीनें असें कळवितों कीं, तुम्ही वाटणी पत्र होण्य बद्दल वरील गोष्टीचा उपयोग करून व खरी गोष्ट छपावून जिनगी सुमारें ६,००० सहा हजाराचीच आहे. त्यांतून तुमचे वाटणीस २००० दोन हजारच येतील; या करितां आम्ही जे देतों ते घेऊन फारकती द्यावी. अशी गैरसमज विशीं केली. तसेंच तुमचें मनांत खरेंच कपट असल्यानें वाटणी पत्रांत एक व पावती पत्रांत एक असें लिहून घेतलें या वरील कारणानें सदरी वाटणी पत्र आणि पावती रद्द आहे. आम्हास मंजूर नाहीं असें कळवितों. आमचे वाटणीस जी वास्तविक मिळकत येत असेल ती देऊन पावती घ्यावि तसें न केलें तर रीति प्रमाणें तजवीज होईल कळावें.

तारीख ३ माहे जून सन १८८७ इसवी.

(सही) लछुसिंग वल्द धनसिंग जमादार ४ था रिसाला ३ निरादरी कंटीनजंट हैद्राबाद दस्तुर खुद्द.

---

### नोटीस.

खाली सही करणार इजकडून तुकाराम वल्द लक्ष्मण राहणार वाटखेड प्रगणें तळेगांव दशासर तालुके येवतमाळ जिल्हे वणी यास देण्यात येते कीं जाती धर्मा प्रमाणे आपला उभयतांचा विवाह होऊन त्यास २० वर्षें झालीं आलिकडे पंधरा वर्षापासून मी आपले मायबापाचे घरीं तुझे नावावर बसून आहे परंतु जगरीतीप्रमाणें तूं मजला नेऊन आपले घरीं वागविले नाहींस. कारणानें अन्नवस्त्राकरितां रुपये २०० सावकाराचे कर्ज करणें भाग झालें. आतां मात्र माझा निर्वाह होत नसून मझे प्रपंचाचे दिवस व्यर्थ जात आहेत करितां ह्या नोटीसीनें असें कळवितें कीं ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आत मौजे वाटखेड प्रगणे तळेगांव दशासर तालुके यवतमाळ येथें मजपाशीं येऊन सदरील रुपये दोचशे व मजला वागविण्याविषयीं योग्य जामीन घेऊन येऊन मजला घेऊन जावें. असें न केल्यास सदहू मुदत पुरी होतांच मी दुसरा नवरा करून आपला प्रपंच करीन मग मात्र तुझी तकरार ऐकली जाणार नाहीं हे खूप समजावें ही नोटीस दिली सही तारीख २३ माहे मे सन १८८७ इसवी

सही

सहीची निशाणी वर्धी मर्द तुकाराम इची बागडी

---

### नोटीस

रा. रा. गोपाळ गणेश देशपांडे कजबे चांडोळ यास खालीं सहीकरणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं. आम्हीं तुम्हास मौजे सावंगी प्रगणे चांडोळ तालुके भोकरदन येथील आमचा रुसमाचा पैसा सन १२७६ पासून सन १२९५ पर्यंत २० वर्षांचा सरकारात घेणे राहिला होता, तो घेण्यातबद्दल ता १०।१८७ इ० रोजी तुम्हास मुकत्यार पत्र दिले. त्या प्रमाणे तुम्हीं तो पैसा आणिलात. परंतु अद्याप पावेतों आम्हास दिला नाहीं. करितां या नोटीसीने तुम्हास कळविण्यात येतें कीं हीनोटीस पोंचल्या पासून आठ दिवसाचे आत आमचा पैसा आणून द्यावा न दिल्यास विश्वास घात केल्या बद्दल इंडियन पि० कोड क० ४०५ प्रमाणे फौजदारींत फिर्याद करून नंतर पैशा बद्दल दिवाणींत दावा केला जाईल व दोन्हीं फिर्यादीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल, तुम्हीं आम्हांस ता० १०।१।८७ इ० रोजीं करार नामा लिहून दिलात आहा त्याप्रमाणे वर्तन केले नाहीं सबब नोटिस देणे भाग पडले नोटीसीचा खर्च हि तुम्हास द्यावा लागेल कळावे ता० ८ माहे जून सन १८८७ इसवि.

(सही)

नारायण माधव देशपांडे चांडोळकर हल्लीं मु० पिंपळगांव राजा.

---

## पत्रव्यवहार,

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

वि० वि० मी आपल्याकडे चार ओळी पाठविल्या आहेत त्यांस आपण कृपा करून आपल्या सर्वमान्य पत्राच्या येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

...थील ... लि... व गांवातलि चार शिष्ट——— कायहो! पत्रकर्तेराव हें विद्यार्थी असे पुच्छ पुळीत कां! मला वाटते हे विद्यार्थी मुळे नसून यांना सभ्य गृहस्थ म्हणता येईल असें असून यांच्या अंगी अभिमान कसा तो मुळीं वसतच नाहीं. स्वतःविषयीं आपल्या वर्गा विषयीं नाहीं मग शाळेविषयीं तर नावच नको काढाला. मला वाटते याला पोरांचा हलगर्जीपणा व मंडळीचा ह्या विषयीं निःकाळजीपणा. ह्यांची गांवांत प्रतिष्टा म्हणजे ४ वर्षांच्या पोरा इतकी. ह्याना जिकडे तिकडे मत जाव. लायब्ररीत गेले कीं दारावर एक पोर " अंदर जानेका हुकुम नहीं " असें म्हणाला तयारच. खरोखर अशी कामें माझे मते धमार्थ असावीत. मी अशा कुरकुरी ऐकल्या आहेत कीं हयस्कुलातील विद्यार्थी वर्तमानपत्रें फाडतात. पण हें संभवते तरी काहो; जे विद्यार्थी ३—४ वर्षांनीं अंडर ग्राजुएट या नात्यानें लायब्ररीच्या सेक्रेटरीच्याच सेकाय पण इतर बड्या ग्रहस्थांच्या खुर्चीशी खुर्ची लाऊन बसणार ते असें करतील असें मुळीच संभवत नाहीं. ह्या रखवालदार पोराच्या उनाड सोबत्यास, ज्यांची तेथें नेहमी धिंगामस्ती चाललेली असते, मात्र परवानगी, व ध्यान का नाहीं? हो, कदाचित् ते दांडगाई बद्दल तर सेक्रेटरी साहेबाना वर्गणी देत नसतील ना ? एखादा मोठा दरबार भरला तरी तेथें ही याना " मत् जाव " आहे आणखी किती सांगू. नको जाउद्या; ऐकतां ऐकतां तुमचेकान किटून जातील व सांगतां सांगतां माझेहि पण तोंड दुखून येईल. फार लांब जाण्..त नको. नुक्ता झालेला आपल्या महिषीच्या जुबिलीचा समारंभ. उत्साह एकंदरीत बराच झाला परंतु त्यांत हयस्कुलातील मुलांस वाटा आहे काय? मुळीच नाहीं. राणी साहेबास मानपत्र पाठविण्याच्या दिवशीं जो दरबार भरला त्यावेळीं हं हे कोण बाबा साहेब. हे कोण अबासाहेब हे कोण भाऊ साहेब ह्या ह्याना खुर्च्या हे कोण रावसाहेब, हे कोण डे०क० ह्या यांना रिझर्व्हड् चेअर्स. हे कोण यांच चपराशी व बसा बाकावर कारकून मंडळीं बसा त्याच बाकावर पण बिचारी हयस्कूलची मुळे त्यांची ना दाद ना फिर्याद. ह्या दिवशी व्यवस्था राहिली नाहीं हे खरे आहे पण रिझर्व्हड खुर्च्या प्रमाणें यांच्या करतां नुसते बाकच ठेवले असते तर बस होते. दुसरे दिवशीं एकाबड्या नेटिव्ह कामगारानें युरोपियन व नेटिव्ह कामगारांच्या रंजनार्थ व राणी साहेबांच्या सन्मानार्थ हायस्कुलातील गवय्ये विद्यार्थ्यां कडून सुंदर पद्यें गावविली व पुढें नाटक करविले व युरोपियना करतां चहा काफी हीं होती असे म्हणतात. ह्या दिवशीं ही ह्या मंडळीची तरी अशीच स्थिती. ... भिक्षुक भटां ... मा... ...गीं जाण्यास जानू जानू पछाडले पण शिपायांच्या बडग्या शिवाय कांहीं लाभ झाला नाहीं. शेवटीं हें धरणेंच धेऊन बसले आहेत असे पाहून मुख्य मालकाला म्हणा अथवा शिपायांना त्यांची दया येऊन त्यांना आंत घेतले. वा; काय यांची पत व किती ही त्यांना आपल्या अब्रूची चाड! यांना बोलावून जागा दिली नाहीं काय! छे असें कसें होईल मग यांना विसरलेच किंवा ह्याना भिक्षुक म्हणून बोलावले नाहीं? विसरले म्हणावें तर जो मनुष्य आज ह्या प्रांताच्या राज्यें कारभारांचा एक भाग आपल्या शिरावर घेऊन मोठ्या दक्षतेनें तो चालवीत आहे व ज्याला या खास्या संबंधीं हजारो गोष्टी ध्यानांत ठेवाव्या लागतात त्याची स्मरण शक्ति लहान म्हणता येईल काय; व तो हे विसरेल काय? खरोखर जीं मुलें तेथें पद्यें म्हणावयाला गेली त्यांना जर आपल्या शाळेचा निदान आपल्या वर्गाचा अभिमान असता तर गेली असती काय? आपण तयार केलेली चहा काफी ही मुलें मागतील अशी तर ह्या अधिकाऱ्याला धास्ती पडली नव्हती ना! असो.

विद्यार्थ्यांनो? जागे व्हा, अहो ज्याना स्वाभिमान नाहीं तो नर पशूं. तुम्हाला तुमच्या आईबापांनीं " Low, we go " =म्हा आम्ही जातो व " वयम् गच्छामः " = " We go " एवढेंच शिकण्या करतां पाठविलें नाहीं. तर शाळेंत तुम्हाला प्रत्येक गोष्ट शिकावयाची आहे.—आपण लोकांशीं जेणें करून आपला बोज राहील असें कसें वागावें इ० इ० तुमची या गांवांत जितकी किंमत आहे तितकी हलकी ... नाहीं आहे. आज उमरावतींतील हायस्कुलातील मुलांनीं आपली किंमत इतकी वाढविली आहे कीं तेथील लोक " हयस्कूल म्हणजे आमचा उजवा हात " असें म्हणतात. याचें कारण काय? फक्त त्यांच्यातील एकी. परवा जुबुलीच्या समारंभाच्या वेळीं इथल्या प्रमाणेंच अव्यवस्था न होऊन हायस्कुलातील विद्यार्थ्यांना जागा मिळाली नाहीं. तेव्हां त्यांनीं आपल्यातला एक प्रमुख करून मंडळींना असा निरोप पाठविला कीं आम्हाला जागा द्या नाहींतर आम्ही येत नाहीं इतकेच नव्हेतर गाणारी मुलें देखील येत नाहींत. तेव्हां त्याना जागा मिळून त्यांची सर्व व्यवस्था झाली. तुमच्या वरही असाच प्रसंग प्राप्त होता त्यास तुमची जर एकी असती तर तुम्हाला असें " भिक्षुक " नांव मिळालें असते कां? पण तिचाच तर अभाव. व ह्या गाणाऱ्या मुलांना तरी आपल्या शाळे विषयीं अभिमान नको पाहिजे होता काय? एका ... नें बो... ...च्या मनांत ...

रोपटें लाविलें होतें परंतु तो माळी दुसरीकडे गेल्यामुळें त्या रोपट्याला वेळचे वेळेंवर पाणी मिळालें नाहीं. व आतां तो आहे किंवा नाहीं याचा ही संशयच आहे. तर एकी करा. ह्या एकीला कित्येक फिलाजफर गुरू विघ्नें आणतील तर त्यांस योग्य वेळीं हणून पाडा. दुसऱ्या बुकांतील " म्हातारा आणि त्याचे लेक " ही गोष्ट चांगली लक्षांत ठेवा जे गुरु तुह्माला न्यायानें व प्रीतीनें वागवतील त्यांस पूज्य माना. पण आधीं एकी!!

आपला
छात्रमनाचा
कनवाळु.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ट वद्य ७ शके १८०९.

गावांत महामारीचा उपद्रव सुरु झाला. अशा वेळेस नेहमीं प्रमाणें शहर चांगलें स्वच्छ आहे ही एक समाधानाची गोष्ट आहे. या स्वच्छतेबद्दल मुनसीपालिटीचें त्या कामीं असलेल्या नोकराची तारीफ केली पाहिजे. नेहमीं व त्यांत विशेषेंकरून असे रोग उत्पन्न होतात त्यावेळीं हवा जागा आणि पाणी हीं फार स्वच्छ पाहिजेत. त्यांत हवेची स्वच्छता पराधीन आहे. ती नुसत्या मानवी साधनांनीं शुद्ध ठेवितां येत नाहीं. जागेची स्वच्छता मुनसिपालिटीनें आपल्या दक्षतेनें असावी तशी ठेविली आहे. आतां राहिली पाण्याची स्वच्छता. तिचा मात्र अभाव आहे. येथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा काय तो नदीचा. नदीचे पाणी, तींत स्नान, धुणे, गुरांना पाणि पाजणे वगैरे बंद ठेऊन मोठ्या व्यवस्थेनें जितके चांगलें रहावयाचें तितकें चांगलें मुनसीपालिटीनें ठेविलें आहे.

नदीस दोन बंधारे आहेत; एक गांवाचे वरचे बाजूस व दुसरा खालचे बाजुस. पावसाळा होऊन कांहीं दिवस होतात तोंच दोन्ही बंधाऱ्यांत फळ्या बसविल्या जातात व त्या योगानें नदीचे पाण्याची वाहण्याची स्वाभाविक गती कुंठित करून त्या दोन बंधाऱ्याचे मध्यें गांवास हिंवाळ्यांत व उन्हाळ्यांत पुरवठा होण्या करितां पुष्कळसे पाणी साठविले जातें. हे सांठवलेलें पाणी सरासरी एप्रिल अखेर पर्यंत बरें असतें. पुढें त्यास थोडथोडा वास येऊं लागतो व उन्हाळ्याचे शेवटी शेवटीं तें इतकें वाईट होतें कीं त्याची चव बरीच बिघडते आणि वासही बराच वाईट येतो. असें पाणी लोकांच्या पिण्यांत ये[illegible]पाय कारण होतें हे सांगणें नकोच.

आमच्या मुनसिपालिटीच्या हातून पाण्याची चांगली सोय आद्याप कां होत नाहीं हे समजत नाहीं. कदाचित् पैशाची अडचण असेल. हे खरें आहे कीं असी [illegible] कामें थोड्या [illegible] हीं होत नाहींत [illegible] कम[illegible] ताई आहे व त्याची सोय करणें फार जरूर आहेहें लक्षांत आणून त्यांनीं खामगांव मुनसिपालिटी प्रमाणें पैसे उसनें काढून हे महत्वाचें काम हातीं घेणे फार अवश्य आहे. व तें पैसे फेडण्या करितां शहरच्या स्थितीस इतर गोष्टीस योग्य असा एखादा सरसऱ्याच्या करा सारखा कर काढावा. मात्र तो देणार लोकांस जड न झाला म्हणजे झालें.

## हिंदुस्थानांतील गव्हाची भावी स्थिति.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

इंग्रज सरकारचें राज्य या देशांत आल्यापासून पुष्कळ फायदे झाले त्यापैकीं जिकडे तिकडे शांति व स्वस्थता झाली हा एक होय. परंतु याच शांततेमुळें जमिनीची लागवड जास्त झाली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पुष्कळ वृद्ध जमीदार मंडळीस आठवत असेल कीं आपल्या वऱ्हाड प्रांतांत मे.गल्लाई अमलांत कुळें जमिनीवर ओढून ओढून बसवावी लागत असत व त्यांस जमिनी जबरदस्तीनें त्यांचे माथीं मारून त्यांजकडून वाहीत करवाव्या लागत असत. ती स्थिती आजनाहींशी होऊन जिकडे तिकडे शांतता झाल्यामुळें जमीनी पुर्वीपेक्षां चौपट लागवड होत आहेत व जमिनीस चांगला दर आला आहे. हल्लीं वऱ्हाडांतील तीन जबरदस्त शेतकीची उत्पन्नें गहूं, कापूस, व जवस हीं होत. या पैकीं वर सांगीतल्या प्रमाणें आज गव्हा संबंधानेंच विचार करणें आहे. इतकी जमीन जरी नवीन लागवड झाली आहे तरी व वऱ्हाडांतील जमीनी इतक्या उत्पन्नाच्या आहेत तरी पुर्वीपेक्षां हाल्लीं गव्हाची किंमत किती वाढली आहे? याचें कारण हेंचकीं माल विलायतेस जाऊं लागला त्यामुळें त्या मालाची चणचण जास्त झाली. हें मात्र नेहेमीं लक्षांत ठेवले पाहीजे कीं वऱ्हाडांतील धान्याचा पुरवठा माल दुसऱ्यादेशीं गेल्यानें तितका कमी होतो व गल्ला तितका आपले प्रांतांतून नाहींसा होतो. या प्रमाणें गव्हास दिवसें दिवस जास्त मागणी असल्या कारणानें गहूं जितके उत्पन्न होतील तेतके फायदेशीर होणार आहे. वर सांगितलेंचं आहे कीं आपल्या या देशांत व्याज म्हणून पुष्कळ पैसा विलायतेंत प्रत्येक वर्षीं भरावा लागतो त्याप्रमाणेंच त्या देशांतील मालाऱाठीं मोबदला द्यावा लागतो या दोन्हीं कारणामुळें पैसा न पाठवितां त्याचे जागीं गहूच पाठवावा लागतो. जसजसे गहूं परदेशीं जास्त जातील तसतसे आपल्या देशांतील लोकांस त्यांच्यास तितकें कमी झाले हें उघडच आहे. असे जर गहूं कमी होत गेले व त्यांतच माहाग होत चालले तर येथील कामकरी लोकांची तरी काय वाट होणार? त्यांस तरी भाकरी माहागाईची खावी लागल्यास सगळी मिळत असल्यांस अर्धीवरच निर्वाह करावा लागणार नाहीं काय? तर या [illegible] संबंधानें आजच वि[illegible] व नाग[illegible] त ही हिंदुस्थान देशाचें केवळ धान्याची भांडारे आहेत व म्हणुनच आपल्या प्रांताचे लोकांनीं गव्हाचे संबंधानें विचार करणें भाग आहे.

I think I have now touched on all the most important points in Mr. Telang's minute. What I have said comes to this that we do not ask to protect Rukhmabai from the penalty to which she is now ezposed because her marriage, contracted in infancy and without her own consent, was no marriage at all, but because imprisonment for the refusal of conjugal society by woman is a thing in itself barbarous and repulsive, and doubly so in India where women are already pressed down under the yoke of such cruel inequalities. I do not also lay particular stress on the plea that the suit for restitution of conjugal rights should only lie in cases where those rights have been exercised, for I consider that conset, not co-habitation or consummation, is the formal condition of the validity of any marriage. But I agree with Mr, Telang that this is a circumstance of considerable weight in determining the amount of penalty, supposing that any penalty is enforced.

The practical questions raised by Mr. Telang I reserve for discussion at our next meeting. I will only say here that I am most desirous to bring the action of our Committee, as far as that may be possible, into conformity with his views. I am also anxious to have a more distinct idea of the nature and extent of the pecuniary penalty which he would wish to substitute for imprisonment. It is clear to my mind that a person in Dadoji's position is entitled to some compensation for the disappointment and vexations he has undergone, and the opportunities missed of forming other matrimonial engagement. The amount of this [com]pensation, as in case of English suits for breach of marriage promise, ought I think to be determined on consideration of all the circumstances of each particular case."

---

We have been asked to write our impressions about a nursery and seed-depot owned by Messers Vishnoo Sadashiv and Co: at Poona. The Nursery occupies a central site near the Sassoons Hospital [illegible] the road from the G. I. P. Railway Station to the city. It contains a variety of English plants and vegetable seeds. There are more than a hundred sorts of lovely Crotons, an oriental collection of first-class roses including *Marchal Neil* and other rare kinds and an infinite variety of choice mango trees. The firm has connections with almost all the parts of the world and is supplied with choice plants from all, But what is perhaps very much to the convenience of intending purchasers, is, that the price list of the firm is very moderate and the *lowest* rates that we know of in any Indian nursery, are quoted. We recommeud the Nursery to such as may have a taste for plants both decorative and useful.

## वऱ्हाड

रा० रा० गणेश बापुजी आ० ए० क० हे परवाचे दिवशीं रजेवरून परत येऊन वाशिमास आपले कामीं रुजूं होण्यास गेले.

मि० यासीनखां साहेब असिस्टंट कमिशनर यांची पुन्हा येथील स्मालकाज कोर्टावर नेमणूक झाली, आणि त्यांचे मुलकी व फौजदारी काम मि० डेव्हिस साहेब असिस्टंट कमिशनर यांज कडे दिलें.

जळगाव तालुक्यांतील दाम दुप्पट देणार महार लोकांवर इं० पि० कोड कलम ४९० प्रमाणें ठक बाजी बद्दल खटला होऊन त्यास मि० मारीस साहेब अ० क० खामगांव यांनीं गुन्हेगार ठरवून त्यांतील १४ इसमास एक एक वर्षाची, एकास दीड महिन्याची व एकास एक महिन्याची शिक्षा दिली. याच गुन्ह्याचे संबंधानें कित्येक दुसरे लोकांवर येथे ए. डे. क. साहेब यांचे पुढें मुकद्दमा चालू आहे,

मि० ग्यारेट साहेब नवीन नेमलेले असिस्टंट कमिशनर गेले आठवड्यांत उमरावतीस येऊन दाखल झाले.

रावसाहेब श्रीराम भिकाजी जटार डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रकशन काल रोजीं रजेवरून परत आले.

येथील डे० क० आफिसांतील क्लार्क मि० कृष्णस्वामी यांनीं पेनशन घेतल्यावरून त्यांचे ५० रुपयांचे जागेवर रा० वामनराव काळे यांस त्यांचे ४० वर रा० शंकर तुकाराम यांस त्यांचे सब् प्रोटेम ४० वर रा० धोंडु हरी यांस व आक्टिंग ४० वर रा० लक्ष्मणराव ओक यांसीं व त्यांचे सब् प्रोटेम २५चे जागीं मि० सोमय्या यांस व त्यांचे २०चे जागेवर मि० मिनेझेस यांस नेमलें.

येथील पोस्ट मास्तर मि० मेवरी यांनीं एक वर्षाची रजा घेतल्यावरून त्यांचे जागीं रा० अंताजीपंत खामगांवचे पोस्ट मास्तर यांस नेमले. मे० रुस्तमजी फरदुनजी नवीन आट्टार्नी यांस एलिचपुरास नेमले व मि० हशमत अली या नांवाचे आध्याचे वऱ्हाडांत लवकरच येणार आहेत. मे० डाक्टर कूपर व्हेटेरीनरी सर्जन हे येत्या आक्टोबर महिन्यांत आकोल्यास गुरांचे एक मोठे प्रदर्शन करणार आहेत असे कळते. मद्रास प्रांतांतील मि० जनरिक न्यासि[illegible] यांस वऱ्हाडांत लवकरच सेक्टंड क्लास असिस्टंट कमिशनर नेमणार असे समजते.

---

## वर्तमानसार.

हल्लीं इंग्लंडातील लोकप्रिय व लोकसमाजाचे प्रमुख जे ग्लाडस्टन साहेब ते पार्लमेंट सभेंत ता. १८ एप्रील रोजीं ऐरलंडच्या संबंधानें अत्यंत कडक, व अपूर्व व ऐरिश लोकांचें निरंतरचें स्वातंत्र्य नष्ट करणाऱ्या कायद्याच्या मसुद्याच्या दुसऱ्या वाचनाच्या प्रसंगीं भाषण करीत असतां, एक्या नवीन पुस्तकाचा आधार घेऊन बोलले कीं क्वीन एलिजाबेथच्या कारकीर्दीपासून हल्लींच्या कारकीर्दीसारखी अनिष्ट व नाशकारक दुसरी कारकीर्द झाली नाहीं. या कारकीर्दींत दुष्काळानें सव्वाबारा लक्ष लोक मेले, ऐरलंडांत ३९,६८,००० मनुष्याचीं घरें, दारें, शेतें वगैरे घेऊन निराश्रित करून हाकून लावलें; आणि ४१,८९,००० लोक त्रासानें देशत्याग करून परदेशीं गेले; आणि अशा कारकीर्दीची आह्मी जुबिली समारंभ करणार आहों. असें ते बोलले. आतां ग्लाडस्टन साहेबांनीं हे दोन तीन अनिष्ट प्रकार सांगितले ते बहुतकरून ऐरलंडच्या संबंधाचें सांगितले. त्या शिवाय हिंदुस्थानांत याच कारकीर्दींत किती लोक दुष्काळानें मेले असतील, किती धुळीस मिळाले असतील व किती लोक सन १८५७ च्या वगैरे प्रसंगा सारख्या प्रसंगीं या देशांत, ब्रह्मदेशांत, इजिप्त देशांत, जूलु लोकांच्या देशांत वगैरे मारले गेले असतील कोणजाणे आलेक्झांड्रिया शहरा सारखां किती गांवांचा समानाश झाला असेल हें कोणी सांगावें? सारांश या कारकीर्दींत किती अनर्थ झाले असतील हें सांगतां येत नाहीं? परंतु या जुबिलीच्या ऐन समारंभाच्या वेळीं ऐरिश लोकांस पूर्ण व निरंतरच्या गुलामगिरीची देणगी मिळण्याच्या बेतांत येत आहे. याजवरून हिंदुस्थानच्या लोकांस काय देणगी मिळेल याची वाट पाहात राहावें. आतां हा सर्व प्रकार कसा ही असो प्रत्यक्ष महाराणी साहेबावर खुद्द या संबंधानें कांहीं दोषारोप करतां येणार नाहीं ह्यांच्या हातींच मुळीं कांहीं एक बरें वाईट करण्याचें नाहीं. ह्या केवळ पोकळ नामधारी राज्याधिकारी आहेत. तेव्हां त्यांस कोणत्याही प्रकारें बरें वाईट ह्मणतां येत नाहीं. इतकेंच नाहीं; पण खासगी रीतीनें ह्यांच्या स्वतां विषयीं पुष्कळ लोकांची पूज्य बुद्धी आहे. तात्पर्य इतकेंच कीं ज्यांकडे राज्यकारभार चालविण्याचें काम आहे त्यांणीं जें काय करणें तें पूर्वापार संबंध पाहून कालदेशवर्तमान मनांत आणून बेताबातानें व लोकांच्या डोळ्यांत न खुपेल इतक्या साधारणपणें करणें तें करावें. राजे लोकांच्या ह्मणजे व्यक्तीच्या हातांत विशेष अगर पूर्णाधिकार असावा असें दिवसानुदिवस कोणी ह्मणणार नाहीं. प्रजेच्या उत्कर्षाचा हा समय आहे आणि त्यांच्याच हातीं सत्ता असावी व त्यांणीं त्या आधिकाराचा उपयोग प्रजेच्या हितार्थ करावा परंतु राजेलोक, बडे लोक वगैरे जुने लोक याची मान खंडणा करण्यांत त्या आधिकाराचा उपयोग करूं नये इतकेंच आमचें ह्मणणें आहे.

धुळ्याच्या आसपास चोरांचा उपद्रव [illegible] दिवसाही [illegible] बाहेर जाणें कठीण [illegible]

— देवगड तालुक्यांत एका गाईस एक गोऱ्हा झाला आहे त्याच्या पाठीच्या कण्यावर तीन स्तन असल्याचें समजतें.

— इंग्रज सरकार अफगाणच्या अमिराच्या मदती करितां क्वेटा येथें कांहीं लष्कर पाठविणार आहे असें ह्मणतात.

— हिंदुस्थान शायरमध्यें दोन वर्षामागें एक भयंकर रीतीचा खुन झाला होता. तो घरांतील स्त्री नांवाच्या एका चाकरानें केला ह्मणून शाबीत होऊन त्यास फाशीची शिक्षा झाली त्याप्रमाणें स्त्री यास तीन वेळ फाशी चढविलें परंतु तीनही वेळ त्याच्या गळ्याचा फास तुटला ह्मणून त्यास जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा दिली. नंतर थोड्या दिवसांनीं त्याच घरांतील एक दासी मेली तिनें अंतकाळीं तो खून आपण केल्याचे कबूल करून त्याबद्दल सबळ पुरावा दिला त्याविषयीं चौकशी करून ली यास सोडून देऊन सरकार त्यास प्रत्येक आठवड्यास ३० शि. देतें असें व्हानिटी फेयर वरून समजतें.

— महाराणी साहेबांनीं एक मुगुट केला आहे त्यास २१६६ रत्नें असून त्याची किंमत १,३३००० पौंड आहे असें ह्मणतात.

—नवीन महादोनें आपणास खेदिवानें सोडनचा राज्यकर्ता कबूल न केल्यास, का पण इजिप्त जिंकूं अशी भीति घातली आहे.

— जर्मन सरकारानें तीन चार दिवसांत फ्रान्सांत ३,९०,००० लष्कर जाऊन धडकेल अशी ऱ्हाईन नदीच्या दोनही बाजूंस व्यवस्था करून ठेविली आहे.

— बंगाल इलाख्यांतील पोस्टखात्याच्या आधिकाऱ्यांच्या अव्यवस्थितपणाबद्दल हिंदुस्थान सरकार त्या संबंधानें चौकशी करीत आहेत.

— हिरात प्रांताच्या बाजूस रशियन सरकार नवीन रेल्वेचा रस्ता तयार करण्याचा विचार करीत आहे व मर्व्हपासून पंचदेपर्यंत तारायंत्र सुरूं केलें असें ह्मणतात.

— कलकत्ता हायकोर्टाच्या आधिकारांत कांहीं फेरफार होणार आहे असें म्हणतात.

— महाराज धुलिपसिंग हे रशियांत जाऊन राहिल्यापासून त्यांच्या चलनवलनाकडे इंग्रजसरकारचें बारीक रीतीचें लक्ष आहे असें म्हणतात.

पुण्यास गणेश पेठेंतलि एका कासाराचा एकुलता एक मुलगा कांहीं कामाकारितां थोड्या दिवसापूर्वी सोलापुरास गेला होता तेथून कोणी बिघ्नसंतोषी मनुष्यानें त्याच्या वृद्ध पित्यास तो मेल्याची तारायंत्रांतून बातमी पाठविली. तेव्हां तें सर्व कुटुंब त्याचे क्रिया कर्मांतर करण्याकारितां सोलापुरास गेले. तेथें जाऊन पहातात तों पठ्ठ रीनाय हसत खेळत आहे. असें डेकनहेरल्ड वरून समजतें.

— कंदाहाराहून काबुलांत एक व्यापाराचा तांडा जात होता त्यास मार्गांत चोरांनीं लुटले व त्या तांड्या बरोबर कंदाहारच्या गव्हरनराची एक तरुण कन्या होती ती [illegible] आहेत. येथें पुढे. [illegible]

हिंदुलोकांजवळ सध्यां राहिलेली मुख्य संपत्ति की अतिशय फलद्रूप जमीन, ती तर या परकीयांच्या डोळ्यांत रात्रंदिवस सलत असून ती कोणत्या तऱ्हेनें स्वकीयांच्या हातांत येईल हा त्यांस निदिध्यास लागलला आहे. तिकडील कुबेरपुत्र आपल्या सरकाराजवळ मागण्या करीत आहेत कीं, इकडील खडकाळ आणि डोंगरी जमिनींतलि पिकावर आमचा निभाव लागत नाहीं, या करतां हिंदुस्थानांतील फलद्रूप जमिनी विकत घेऊन आम्हांस तिकडे स्थानिक वसाहती करण्याविषयींचा हक्क द्या. परंतु "तुर्तंच तशा रीतीचे हक्क देण्याची वेळ आली नाहीं; ती वेळ अजून दूर आहे; तोंपर्यंत धीर धरा; जमिनीवरील वाढविलेल्या अतिशय करानें जेव्हां हिंदुलोक कंटाळून आम्हांस ह्या जमिनी नकोत ह्मणून सोडून देतील, तेव्हां मग अनायासें तुम्हांस त्या जमिनी विकत घ्यावयास सांपडतील" अशा रीतीचा त्यांच्या सरकाराकडून त्यांस जबाब मिळाल्यामुळें त्यांची थोडीशी निराशा होऊन भावी प्राप्त हो, णाऱ्या लाभाकडे नजर देऊन ते ती वेळ केव्हां येते ह्मणून चातकाप्रमाणें मार्ग प्रतिक्षा करीत आहेत! कित्येक गौरकाय ऋषि रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून हिंदुलोक आपल्या उन्नतीसाठीं हातपाय हालवितात कीं काय हे पाहात आहेत हिंदुनीं आपले पुरातनचे हक्क संपादनाबद्दल यत्किंचित् जरी हालचाल केली तरी ते त्यास बंडाचें स्वरूप देऊन एकसारखा काव्ळ्याप्रमाणें कोलाहल करीत आहेत!!

विलायतेस जे इंपेरियल इन्स्टिट्युट नांवाचें विद्यालय स्थापन होणार आहे त्याबद्दल युनायटेड किंगडम, कानडा, आस्ट्रेलिया, येथील लोकां कडून अनुक्रमें १,८९,०००; २०,०००; आणि १ लक्ष पौंड वर्गणी देण्यांत आली.

कूचबिहारचे महाराज आणि महाराणी व कच्छचे राव हे महाराणीसरकारास गेल्या ता. १८ रोजीं भेटले.

इंग्लंडांत होळकरमहाराज, कच्छचे राव, कुचबिहारचे महाराज, गोंडाळचे टाकूर आणि जोधपुरचे महाराज हे जाऊन पोहचले.

अमिराची वर्तणूक जुलमी आहे ह्मणून बुलाऱ्याची प्रजा आपला तो प्रांत रशियाच्या स्वाधीन करणार आहे. काबुलच्या अमिराविरुद्ध बुलाऱ्याची फक्त प्रजाच नसून तेथें चांगल्या प्रकारची व्यवस्था व्हावी असें इच्छिणारे मोठमोटाले लोक मुल्ला हे आहेत.

इजिप्तबद्दल इंग्लंड आणि टर्की यांत जो नुकताच तह झाला, त्या तहांतील कलमाबद्दल फ्रेंच आणि रशियन वकील यांणीं टर्कीसरकाराकडे एक नोट पाठविली आहे. इजिप्तमध्यें कांहीं गडबड सुरू झाल्यास तिची शांतता राखण्याबद्दल फक्त इंग्लंड आणि टर्की हे दोघेच असावेत असें जें त्या तहामध्यें एक कलम आहे, तें कलम आम्हांस अगदीं कबूल नाहीं असें त्या वकिलांनीं टर्की सरकारास कळविलें आहे.

इजिप्तमध्यें गेल्या [illegible] इंग्लिश फौजेपै- [illegible]

कीं पुष्कळच लोक कमी करण्यांत येणार आहेत.

नेपाळांतील रेसिडेंटी सर्जन डा. गीमलेट हे ६ महिन्याच्या रजेवर गेल्यामुळें त्या संस्थानांतील निमे इंग्रजकामदार कमी करण्यांत आले. आणि या साहेबांच्या जागीं एक नेटीव नेमण्यांत आला. आहे.

म्हैसुरास आणि सुरतपर्यंत मुंबईच्या किनाऱ्यावर पाऊस पडला. गोंवा आणि मंगलूर येथें ३ इंच पाऊस पडला मुंबई, रत्नागीरी, कोचिन मेरकारा येथें २ इंचावर पाऊस पडला. सातारा; पुणे आणि मालेगांव येथें १ इंचावर पाऊस पडला.

गहूं बाजरी आणि हरभरे या पैकीं कोणत्या पदार्थांचें पीठ शरिरास जास्त पौष्टिक आहे, याचा अनुभव घेऊन असे ठरलें आहे कीं, हरभऱ्याचें पीठ जास्त पौष्टिक आहे. हे पीठ नेटीव सैन्यांत उपयोगांत आणण्यांत यावें. मात्र हें पीठ तयार करतांना त्यांत हरभऱ्यांचीं सालें जातां कामा नये, कारण तशीं सालें गेलीं असतां हगवण लागण्याचा संभव आहे.

काटकसर कमेटीच्या सूचने वरून पोलिस खात्यांतही कांहीं काटकसर होणार असें दिसतें.

नवगांव येथील सब डिव्हिजनल माजिस्ट्रेटकडे कोणी लफंग्यानें असा एक अर्ज पाठविला कीं, फलाण्या गृहस्थाची गतभर्तृका कन्या गरोदर होऊन तिनें पोटचें पाडलें आहे, तर त्याची चौकशी करावी. एवढ्या बाह्यावरून माजिस्ट्रेट साहेबांनीं ताबडतोब पोलिसाकडून त्या मुलीला पकडून आणून परीक्षेकरितां तिला सिव्हिलसर्जनच्या स्वाधीन केलें केवळ एका निनावी अर्जावर पूर्ण भरंवसा ठेऊन तिला धरून आणलें हा एक मूर्खपणा केला तो केलाच, खेरीज दुसरा मूर्खपणा असा कीं, डाक्टरनें तिची परीक्षा आपल्या देखत करावी ह्मणून आग्रह धरला! परीक्षा करितांना आपण येथें हाजर असूं नये ह्मणून डाक्टरनें बजावून सांगितलें, त्याला न जुमानतां स्वारीनें आपण समोर उभे राहून डोळ्याची तृप्ति करून घेतली! पुढें परिक्षे अंतीं त्या साध्वीवर आलेला आरोप खोटा ठरून ती सुटली, आणि हल्लींतिच्या बापानें विनाकारण आपली अब्रू घेतल्याबद्दल त्या माजिस्ट्रेटावर फिर्याद केली आहे. तेव्हां त्याचा रतिप्रमाणें विचार होईलच, पण जी त्या गृहस्थाची अब्रू गेली ती आतां भरून येईल का? एकदां डाग लागला तो लागलाच. ह्मणून आम्ही वारंवार ह्मणतों कीं, अविचारी आणि दांडगे माजिस्ट्रेट असले ह्मणजे लोकांना मुठींत जीव धरून दिवस काढावे लागतात. या करितां सरकारानें हें नाजूक काम कोणाकडे सोपवितांना थोडातरी विचार करावा.

ठा० म०

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

साहत्माही " ३ " " ८८
साल अखेर " ७ " " १८८
किरकोळ अंकास..................८४....

नोटिशी बद्दल
१० ओळीचें आंत रु १
पुढें दर ओळीस ०।८६
दुसरे खेपेस ........०।१

Per annum in arrears 7 " 1R. 8 a
Six monthly............ 3 " 8 as
Single copy.............................. 4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3a

THE BERAR SAMACHAR.

VOL XXI AKOLA MONDAY 27 JUNE 1887 NO 25
वर्ष २१ अकोला सोमवार तारीख २७ माहे जून सन १८८७ इ० अंक २५

## जाहिरात.

वतनदार लोकांबद्दल का यदा.
ह्मणजे,
सन १८७४ चा मुंबई आक्ट ३ रा व सन १८८६ चा आक्ट ५ वरून दुरुस्त केलेला किं. ०।६ आणे. ट० हा० ०॥ आणा.

भाऊ गोविंद सापकर
ज्ञानचक्षुचे मालक पुणें

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ शुद्ध ६ शके १८०९.

## हिंदुस्थानांतील जंगल खात्यांतील नेटिव नौकर

नेटिव लोकांस यांचे योग्यते प्रमाणे व विद्वत्ते प्रमाणें ज्या मोठमोठ्या सरकारी हुद्याच्या जागा मिळावयाच्या त्या पक्षपातादि अन्यायाच्या गोष्टी आड येऊन मिळत नाहींत. या गोष्टीचा विचार करूं लागलों म्हणजे आमचें लक्ष सरकारच्या सर्व खात्यांकडे जाऊन त्यांत नेटिव किती व कोण कोणत्या हुद्यावर आहेत, व नेटिव त्यांना आपल्या बरोबरीच्या युरोपियन व युरेशियन यांच्या वर्गांतील नौकरां सारखी आपल्या हक्का प्रमाणें निःपक्षपातानें बढती मिळते किंवा नाहीं, इत्यादि गोष्टी आमच्या मनांत येतात. याप्रमाणें आतां जंगल खात्याचा विचार करण्याचें आम्हीं योजिलें आहे. हें खातें स्थापन झाल्या पासून बहुतेक सारे गोरे कांमदारांनीच भरलेलें आहे. व या मुळें या खात्याकडे आमचें लक्ष्य जास्त ओढ घेतें. हें खरें आहे कीं इतर खात्यां प्रमाणें या खात्यांत बहुत करून बढत्याचे हक्क मारीत नाहींत किंवा मध्येंच खात्याचे बाहेरील मनुष्य आणीत नाहींत. पण असें होणें साहजिक आहे. कारण या खात्यांत बहुतेक सारे युरोपियन व युरेशियनच आहेत. हक्क मारणें किंवा बाहेरील मनुष्य आणणें ह्या गोष्टी बहुतेक करून नेहमीं नेटिवांच्या संबंधानें होतात. गोरकामदारांच्या संबंधानें क्वचित्. या खात्यांत थोडेसे नेटिवही आहेत. पण त्यांच्या सुद्धा हक्कांचा वगैरे विचार इतर खात्यांतील नेटिवा प्रमाणेंच होतात.

लार्डरिपन यांनीं देहराहून येथें फारेस्ट स्कूल स्थापन केलें. तें स्थापन करण्यांत, नेटिव लोकांस फारेस्ट खात्यास जरूर असणारें शिक्षण मिळून त्यांना त्या खात्यांत मोठमोठीं कामें मिळावीं व तीं त्याप चांगलीं करतां यावीं हा एक लार्डरीपन यांचा हेतू असावा असें आम्हांस पक्कें वाटतें. हा हेतू आजपर्यंत कितपत सिद्धीस गेला हें पुढील हकीकतीवरून दिसेल. आज कित्येक वर्षें या फारेस्ट स्कुलांत शिक्षण देण्याचें काम चालूं आहे पण फारेस्ट खात्यांत खालच्या प्रतीच्या ग्रेडमध्यें दरवर्षास फक्त एक या मानानें. नेटिव लागले आहेत !

या खात्यांतील हुद्यांचे या प्रमाणें वर्ग केले आहेत. ( १ ) देखरेख व हुकुम करणें, ( २ ) अमलबारी करणें ( ३ ) जंगलाचे रक्षण करणें, आणि ( ४ ) कचेरीचे लेख व काम करणें.

देखरेख व हुकूम करणारे हुद्देदारांचे खालीं लिहिल्या प्रमाणें वर्ग व ग्रेडस् केल्या आहेत.

| | | पगार रु. |
|---|---|---|
| कान्सरव्हेटर. | पहिली ग्रेड | १५०० |
| | दुसरी ग्रेड | १२५० |
| | तिसरी ग्रेड | १००० |
| डेपुटी कान्सरव्हेटर. | प० ग्रेड | ९०० |
| | दु० ग्रेड | ८०० |
| | ति० ग्रेड | ६५० |
| | चौ० ग्रेड | ५५० |
| अ० कान्सरव्हेटर. | प० ग्रेड | ४५० |
| | दु० ग्रेड | ३५० |
| | ति० ग्रेड | २५० |

अमलबारी करणारे हुद्देदारांत इतके येतातः—

( १ ) सब असिस्टंट कान्सरव्हेटर; यांचा पगार १५० रु. पासून २५० रु. पर्यंत वाढतो.

( २ ) फारेस्ट रेंजर; यांचा पगार ५० रु. पासून १२०रुपये पर्यंत वाढतो.

फॉरेस्टचें रक्षण करणारांत रेंजरच्या हुद्याच्या खालचे व पन्नास रुपयापेक्षा कमी पगार मिळविणारे सारे येतात.

वर सांगितल्या शिवाय आणखी खालीं दिलेल्या स्पेशल जागा या खात्यांत आहेतः—

इन्स्पेक्टर जनरल आफ फारेस्ट पगार रुपये १७०० पासून २००० पर्यंत; डेपुटी डायरेक्टर, फारेस्ट स्कूल, पगार ७०० पासून ९०० पर्यंत; इंस्ट्रक्टर( शिक्षक), फारेस्ट स्कूल, पगार ६०० पासून ८००; डेपुटी सुपरिंटेंडंट, फारेस्टसरव्हे, पगार ६०० रुपये पासून ८०० पर्यंत.

देखरेख व हुकूम करणें या हुद्याच्या वर्गांतील जागा ठरलेले नियमास अनुसरून व सेक्रेटरी आफ स्टेट आफ इंडिया वेळोवेळीं जे नियम घालून देतील किंवा नी रीत पसंत करतील त्या रीती प्रमाणें, ज्या उमेदवारास त्या धंद्याचें शिक्षण मिळालें असेल त्यास मिळतात; आणि तसे उमेदवार जर साऱ्या जागा भरण्यास पुरेसे नसतील तर ज्यांनीं सब असि. कान्सरव्हेटरचे जागीं पांच वर्षे काम केलें असेल व ज्यांचे आंगीं काम करण्याची विशेष लायकी असेल अशा लोकांस मिळतात.

सब असि० कान्सरव्हेटरच्या जागा फारेस्ट रेंजर यांस बढती होऊन मिळतात, किंवा जे फारेस्ट खात्यांत नाहींत अशा लोकांस कधींकधीं मिळतात. फारेस्ट रेंजरच्या जागा ज्या उमेदवारांनीं देहराहून येथील फारेस्ट स्कूलमध्ये रेंजरचे सार्टिफिकेट मिळविलें असेल, किंवा ज्यांनीं त्या शाळेमध्यें फारेस्टरचे सर्टिफिकट मिळवून पूर्ण दोन वर्षें फारेस्टरचे जागीं चांगलें काम केलें असेल त्यांस मिळतात.

बंगाल इलाखा, आसाम, वायव्य कडील प्रांत, पंजाब, सेंट्रल प्राविन्स, ब्रह्मदेश आणि आपलें वऱ्हाड यांतील फारेस्ट खात्यांतील आफिसरांच्या अगदीं अलिकडील यादी वरून खालीं लिहिल्या प्रमाणें नेटिव व यूरोपियन आफिसर आहेत असें दिसतें.

| हुद्दे | ने.च्या संख्या. | यूरोपियन | नेटिव |
|---|---|---|---|
| इन्स्पे.ज. आफ फारे. | १ | १ | ० |
| असिस्टंट" | १ | १ | ० |
| कान्सर व्हे. आ. फारे. | १० | १० | ० |
| डे डा. आ. फा. स्कूल | १ | १ | ० |
| इन्स्ट्र (शिक्षक)फा.स्कूल. | १ | १ | ० |
| डे.सु फारे. सरव्हे | १ | १ | ० |
| डे. कान्सरव्हेटर | ९६ | ९६ | ० |
| असिस्टंट " | ३७ | ३७ | ० |

साऱ्या जागा युरोपियनांनींच भरलेल्या आहेत असें दिसतें. मात्र एक नेटिव सब असिस्टंट कान्सरव्हेटर सात वर्षें नौकरी केलेला हल्लीं असिस्टंट कान्सरव्हेटरचे जागीं मार्च १८८६ पासून आहे.

सब असिस्टंट कान्सर व्हेटरचे वर्गांतील जागांवर नेटिव व युरोपियन आहेत ते येणें प्रमाणें.

| | जागा. | यूरोपियन. | नेटिव. |
|---|---|---|---|
| बंगाल | ७ | ५ | २ |
| आसाम | ३ | १ | २ |
| वाय. क.प्रांत | ३ | १ | २ |
| पंजाब | ४ | ३ | १ |
| मध्य प्रांत | ६ | १ | ५ |
| वऱ्हाड | ३ | ० | ३ |
| ब्रह्मदेश | ३ | २ | १ |
| | २९ | १३ | १६ |

ज्या नियमास अनुसरून नेमणुका करावयाच्या त्या नियमाप्रमाणें सरकारांस ज्या कामदारांनीं सब असिस्टंट कान्सर व्हेटरचें जागीं पूर्ण पांच वर्षें काम केलें आहे त्यास असिस्टंट कान्सरव्हेटर नेमतां येते व वरील माहिती ज्यावरून घेतली आहे त्यावरून असें समजतें कीं हा वर म्हटलेला नियम सरकारनीं फक्त सात सब असिस्टंट कांसरव्हेटरचे संबंधानें अमलांत आणिला. ते सारे युरोपियन; आणि त्यांपैकीं सहाजणांची त्यांस बढती मिळाली तेव्हां पूर्ण पांच वर्षें नौकरी सब असिस्टंटचे जागीं झाली नव्हती. १६ नेटिव सब असिस्टंट कानसर व्हेटरपैकीं सारे नियमाप्रमाणें रेंजरचे ग्रेड पासून वाढलेले आहेत, व १३ युरोपियन सब असिस्टंटपैकीं एकही रेंजरचे ग्रेड मध्यें नव्हता. सारे ५पूर्वीचें कांहीं एक शिक्षण नसून तसेंच नेमलेले आहेत. नियमाप्रमाणें कधीं कधीं बाहेरील लोक नेमतां येतात हें खरें; पण २९ पैकीं १३ म्हणजे बहुतेक निम्मे जागा बाहेरच्या लोकांना देण्यांत आल्या हें खरोखरच नवल आहे.

पुष्कळ नेटिवांची सबअसिस्टंट-कान्सरव्हटेरचे जागीं पांच वर्षें नौकरी झाली आहे व ते असिस्टंट कान्सर व्हेटरचे जागेस पात्र झाले आहेत हें खरें आहे. कीं नियमां प्रमाणें त्यांस ती जागा मिळण्यास त्यांचे आंगीं काम करण्याची लायकी पाहिजे. आतां आम्हांस हें सारे नेटिव सब असिस्टंट लायक आहेत असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं. तथापि खाली सांगितलेले सब असिस्टंट डिव्हीजनचेंकाम स्वतंत्र रीतीनें करीत आहेत, व असे डिव्हिजनचें काम स्वतंत्र रीतीनें करणें हें असिस्टंट कान्सरव्हेटरचें काम आहे, या वरून खरेच सब असिस्टंट बढतीस लायक असावे असें आम्हांस वाटतें. बाबू जोगेश्वर, नौगांव डिव्हीजन, आसाम; तारांकिसन, गुप्त, सिलहत डिव्हीजन, आसाम; मि. कन्हयालाल, भारण घाट डिव्हीजन, वायव्ये कडील प्रांत; कर्णनिधान मुककरजी, गोंडा डिव्हीजन; चंद्रकुमार चातरजी, वर्धा डिव्हीजन, सें० प्रा० " महमंद धीस, बालाघाट डिव्हीजन,
मि. रसूलखां, बुलढाणा, वऱ्हाड
" मनसुकराय, वणी ,,
या पैकीं कित्येकांचें कामा बद्दल त्यांचे वरिष्ठांनीं आपल्या रिपोर्टांत चार शब्द लिहिलेले जे आमचे नजरेस पडतात त्यांवरून आम्हांस वाटतें कीं हे बढतीस लायक असावेत.

WANTED.
A Survey Karkun with a knowledge of Marathi, Surveying and Map drawing Map salary Rs. 24 per mensem.
Apply to
Bassim 24 June 1887
H. B. Knowlys
Deputy Commissioner
Bassim District.

## पुण्यांतील व्याख्यान मालेपासून आपणास वऱ्हाडांत काय फायदा करून घेतां येइल.

(मागील अंकावरून पुढें चालू)

पुनर्विवाह करावा असें ह्मणणारे राव बाहादुर पुष्कळ आहेत परंतु आजपर्यंत जेवढे ह्मणून पुढारी आहेत तेवढ्यास स्वतः किंवा कुटुंबापैकीं कोणा एका व्यक्तीचे संबंधानें पुनर्विवाह करण्याचा प्रसंग ईश्वरानें आणला. पुनर्विवाह करावा असें प्रतिपादन करणारास असे प्रसंग येऊन ही त्यांनीं पुनर्विवाह न करतां यथाशास्त्र लोकरितीला अनुसरून विवाह केले यामुळें जरी प्रत्येकांस कांहीं तरी खानगी तऱ्हेचीं कारण असलीं तरी ती प्रगट नसल्यामुळें लोकांस तरी सुधारक ह्मणविणारांस दोष देण्यास बरीच जागा झाली आहे. यावर सुधारक लोकांची एक कोटी उडविण्याची तऱ्हा आह्मास ठाऊक आहे ती अशी कीं जरी आपण पुनर्विवाह करीत नाहीं तरी पुनर्विवाह करावा ही गोष्ट लोकांस चांगली आहे असें जाणून उपदेश करतो यांत वाईट काय आहे? पुनर्विवाह वाईट नाहीं हे तत्व तरी निदान लोकांचे मनांत आह्मी बिंबविण्याचा यत्न करितों. आमचे हातून कांहीं कारणामुळें न झाला तर न झाला. यास उलटपक्षाचें उत्तर आहे कीं जर तुमचे हातून पुनर्विवाह प्रत्यक्ष रीतीनें होत नाहीं तर तुह्मी आमचे गुरू बनून जे आह्मास सांगण्यास येता त्यांत तुमची विशेष योग्यता ती काय. ज्या तत्वाचें प्रतिपादन तुह्मी करतां व जी गोष्ट आम्ही करण्याला योग्य आहे असें व्याख्यान रूपानें तुह्मी कळवितां ती गोष्ट जर खुद्द तुमचे ठिकाणीं वसत नाहीं तर तुह्मी सांगतां हे तत्व तुमचे मनांत तरी खरें आहे असें पक्केपणानें बिंबलें आहे असें कशावरून. या योगानें सुधारक ह्मणविणाऱ्या मंडळीचा छाप लोकांचे मनावर बसत नाहींत. हें तर धर्म संबंधी झालें परंतु साधारण धंदे शिक्षणा संबंधानें पाहा, प्रत्येक बड्या मनुष्याची ओरड आहे कीं बावानो धंदे करा, नोकरी करूंनका. नौकरी करून तुम्ही आपले स्वातंत्र्य नष्ट करूं नका. कांहीं तरी स्वतंत्र धंदे करा आणि पोटभरा. उपदेश पाहिला तर या प्रकारचा व कृती पाहिली तर याहून फारच भिन्न एक तरी राव बाहादुरानें आपला मुलगा सुतार लोहार किंवा चित्र काढणारा केल्याचे ऐकिवांत नाहीं. कोणी विलायतेस सिविल सर्वटचे परीक्षेस मुलगा पाठवितो, कोणी सिविल सर्विस मध्ये आलेले मुलाचा प्रवेश होण्याची खटपट करतो, कोणी मामलेदारीचा हुद्दा आपले मुलास मिळविण्याचा यत्न करतो, या प्रमाणे राव बाहादुर व त्यांचे चिरंजिव जिकडे तिकडे गुंतलेले नजरेस पडतात. आतां या वरून लोकांनीं काय समजावें? येवढाले रावबाहादूर व त्यांची लेकचेरे तर त्यांच्याहून ही बडी बडी असतात. त्यांचे मुलांची व्यवस्था जर ते सांगतात त्या प्रमाणें लावीत नाहींत तर लोकांनी कोणत्या रितीनें त्यांचे सांगण्यावर विश्वास ठेवावा. लोकांस जे पुढारी पाहिजे आहेत ते नुसते बोलके घेवडे नको आहेत. कोणी पुढे सरसाहून—हा पाहा मी या रस्त्यानें चाललों आहे, हा रस्ता चांगला आहे व तुह्मी याच मार्गानें चला असा जो पर्यंत कोणी लोकांस भेटणार नाहीं तोंपर्यंत त्यांची तरी खात्री व्हावी कशी व पुढाऱ्यावर विश्वास बसावा कसा? याच प्रमाणें स्त्री शिक्षण वगैरे एक का दोन अनेक विषयाचे संबंधानें हीच रड दृष्टीस पडते. बोलणें एक व करणें अगदीं निराळें. हा आक्षेप आपणावर आणलेला साधारण निरुत्तर आहे असें खचित सुधारक मंडळींस वाटत असेल व याचें उत्तर काय द्यावें अशा विचार प्रपंचात ते नेहेमीं निमग्न असतात परंतु जीं उत्तरें ते शोधून काढीत असतात त्यांतील वास्तविकपणें ग्राह्य असें आमचे नजरेस एकही आलेलें नाहीं.

आतां या सर्व गोष्टींचा इतका विस्तार करून लिहिण्याची आज विशेष आवश्यकता आहे असे वाटून आम्ही हा लेख लिहिण्याचें मनांत आणिलें. आपला वऱ्हाड जरी चिमुकलासा आहे तरी आपल्या शेजारी इंग्रजी मुलखांत काय चाललें आहे हें लक्षांत ठेवून तेथील लहान मोठ्या गोष्टी आपणास उपयोगी पडणाऱ्या असतील तर आपण घेत असतो त्या पैकीं सार्वजनिक सभेची टुम नुकतीच आपण उचलली आहे व हल्लीं पुण्यांत ज्या प्रमाणे व्याख्यानमाला होत आहे व मुंबईत ही होत आहे त्या प्रमाणेंच वऱ्हाडांत ही उमरावती व अकोल्यास व्याख्यानमाला असावी अशी कांहीं मंडळीस इच्छा प्राप्त झाली आहे व त्या प्रमाणें बहुधा येत्या जुलाई महिन्या पासून व्याख्यानमाला सुरूं होण्याचा ही रंग दिसत आहे. अशा वेळीं पुण्याचे व मुंबईचे व्याख्यानमाला मधून काय काय प्रकार नजरेस येतात व त्यांपैकीं ग्राह्याग्राह्य कोणते आहेत याविषयीं विचार करणें प्रशस्त आहे असें आमचे वाचक कबूल ही करतील. आमच्या वऱ्हाडांत मुंबई प्रांताकडील येऊन वऱ्हाडचे रहिवाशी बनलेले व खुद्द वऱ्हाडचे रहाणारे असें पुष्कळ गृहस्थ वर लिहिलेले प्रकारचे व्याख्यान देण्यास अयोग्य आहेत असें नाहीं. परंतु कोणतें ही काम त्यांत मन घातल्या वाचून व उत्साहानें केल्या शिवाय चांगलेसें वाटत नाहीं. असा प्रकार असल्यानें आमच्या येथील व्याख्यानें कितपत रसभरित असतील व कितपत फायदेशीर होतील हें आज सांगतां येत नाहीं. आतां बहुधा व्याख्यानमाला तर होणारच तेव्हां मागील अंकीं लिहिलेले जे गुण दोष तेच आपले व्याख्यानमालेस लागू आहेत असे समजले पाहिजे; व या संबंधानें सर्व पुढारी ह्मणविणाऱ्या मंडळींनीं व व्याख्यानमालेशीं ज्यांचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रितीनें संबंध होणाऱ्या सर्व मंडळींनीं आमच्या ह्मणण्या कडे लक्ष द्यावें असा आमचे आजचे लिहिण्याचा हेतु आहे.

मागील अंकीं आह्मी लिहिलेच होते कीं दोन व्यक्तींचे मतांत कोणत्याही गोष्टीचे संबंधानें भेद असला तरी आपलें मताचे खंडनार्थ मर्म भेदक किंवा विनाकारण लाक्षणीक भाषणें करण्या पासून अगदीं फायदा नसून उलट तोटा मात्र फार आहे. व्याख्यानांचा हा असा तऱ्हेचा प्रसंग प्रसिद्धपणानें वऱ्हाडांत प्रथमच झटला पाहिजे अशा ठिकाणीं एकामेकांचे विचारावर टिका करतांना अतिशय शांति व लीनता ठेवणें अगदीं अवश्यक आहे व तथ्य शोधून काढणें असल्यास तर या दोन गोष्टी फारच अनुकूल आहेत. व्याख्याने देणारांस पुष्कळ वेळां आपलें मतांचा अभिमान असण्याचा संभव आहे तेव्हां टिका करणारांनीं तर शांतपणें व संभावित लोकांचे पद्धतीस अनुसरून टिका केलीच पाहिजे पण व्याख्यानकारांनीं ही आपल्या मता संबंधानें टिका होत असतांना ती सहन करण्याचा गुण आपले अंगीं आणला पाहिजे. मतावर टिका करणारांनीं व व्याख्यानकारांनीं उभयतांनाहीं आपलीं मतें सर्वथैव योग्य असलीं पाहिजेत व त्यांत चूक निघण्याचा संभवच नाहीं असें कधीं ही मनांत आणूं नये. विशेषतः व्यक्ति मात्रास लागेल अशा तऱ्हेचें भाषणें अगदीं गाळून टाकण्याची खबरदारी घेतली पाहिजे व हीं तत्वें मनांत ठेऊन जर चालतील तर व्याख्याना पासून निरनिराळे लाभ ह्मणून जे कांहीं मागील अंकीं विविक्त केले आहेत ते सर्वत्रास मिळतील. लोकांस गोष्ट रुचते कोणची व रुचत नाहीं कोणची व लोकांचे मत अमुक एका विषयासंबंधानें काय आहे हें समजण्यास व्याख्याना सारखें दुसरें चांगलें साधन नाहीं. आमची तिसरी सुचना मागील अंकांत जी दर्शित केली आहे तिचा उद्देश एवढाच कीं व्याख्यानकारांनीं ज्या आपण स्वतः करण्यास तयार नाहीं अशा गोष्टी सामाजिक स्थितीचे अगर राजकीय स्थितीचे संबंधानें करण्यास लोकांस पोकळ उपदेश करण्याचा डौल घालूं नये. पुढारी म्हणविणाऱ्या लोकांवर जे आक्षेप आहेत त्यास आमची मंडळी पात्र आहे किंवा नाहीं हें हल्लींचे व्याख्यान पासून होणार आहे. तूर्त म्युनिसिपल कमेटीचा व लोकल बोर्डचा कायदा आल्या मुळें वऱ्हाडांतील लोकांनीं अमुक तऱ्हेनें अमुक गोष्ट करावी व लोक कल्याणार्थ स्वहिताकडे लक्ष न देतां कमेटीचें कामासाठीं झटावें वगैरे तऱ्हेच्या गोष्टी सांगितल्या जातील. अशा गोष्टींचा ठसा लोकांचें मनावर उमटण्या पूर्वीं व्याख्यान देणाराचें तरी स्वतःचें वर्तन तसें असलें पाहिजे. या व्याख्याना पासून लोकांत पुष्कळ चर्चा होईल व चर्चा झाल्यानें लोकमतांत कदाचित् बदल होण्यास प्रारंभ होईल परंतु हे फायदे होण्यापूर्वीं प्रत्येक व्याख्यानकारानें वर सांगितल्या गोष्टींचें मनन करून त्या प्रमाणें आपलें वर्तन रहाण्या विषयीं यत्न करावा. अशी आमची त्यांस सूचना आहे.

The Berar Samachar

MONDAY JUNE 27 1887.

We are glad to bring to the notice of the educated people of Akola that a series of lectures on subjects social, political, educational &c. should be delivered in the native general library in this season. We believe that this season is most convenient for this object as almost all the big officers, having finished their official circuits, return to their head-station. The lectures should be either in Marathi or English but most of them should be in Marathi as they will be readily understood and appreciated by the people at large. In order that a lecturer should really benifit his audiance he should write out on paper his whole lecture and then read or speak as he thinks convenient for himself. Every educated man is fully aware of the importance of the Hirabag lectures series at Poona. The Honorable M. G. Ranade has the credit of being the founder of these vernal celebrations. The only man competent to do here what Mr. Ranade has done there is Mr. S. B. Jatar.

He by his literary abilities and personal influence can successfully accomplish this work of public instruction. So we earnestly hope that Mr. Jathar will move in the matter and lay the foundation of this institution which we may term वर्षोत्सव व्याख्यान मालिका. Mr. Jathar's presence in such gatherings is a sufficient guarantee against all sorts of fooleries that are sometimes seen the Hirabag lectures.

Mr. Shriram Bhicaji Jatar the director of public Instruction resumed charge of his duties on the 20th June before office hours. Mr. G. C. Aitken, the head master of Akola High school received charge of his duties from Mr. H. R. Rohenkhedkar, the 1st Assistant teacher in the same institution, before noon, on the same day.

Mr. Luxamanrao Chiplunker, second assistant teacher in the A. H. has been posted to the Amraoti High school as the first assistant teachar in the place of Mr. V. R. Joshi on furlough and Mr. Date the officiating first assistant teacher ih the Amraoti High School has been confirmed on Rs. 60 but is to act as the third assistant teacher in the Amraoti High School

On comparing the strength of the teachers staffs in both the High Schools it can be clearly perceived that the Amraoti High School has got a decidedly superior staff of tescher. It would have been far better in the interests of this institution had Mr. Aitken retained the services of Mr. Chiplunkar as the first assistant teacher.

### PROFESSOR WORDSWORTH ON THE RAKHMABAI DEFENCE FUND COMMITTEE.

(Communicated.)

The Honorable K. T. Telang has recently written a note regarding his own ideas as to what he conceives to be the object of the Rakhmabai Defence Committee. Mr. Telang has put his views in un

ना० स०

able terms and has stated *seriatim* what the Committee ought *not* to do. We do not mean to go through all the positions referred to by Mr. Telang in his note; but we have no hesitation in saying that the out spokenness of his convictions shewn in the note in print in a public Journal, redounds very much to his credit. In spite of what some people might say about his opinions in sheer despair and chagrin and in spite of others whose suppressed heartburnings are half revealed in the tone they have assumed towards the author of the notes we are quite sure that Mr. Telang's views are, at any rate, entirely in consonance with the opinions of a majority of Hindus of the present day regarding the marriage system here; and by distinctly avowing his opinions he has given a deadly blow at the self-constituted Defence Committee which is now tottering in its fall and which can only prolong its existence if at all without attracting any particular public importance hereafter.

Mr. Wordswoth, the learned principal of the Elphinstone College for whom we have otherwise the very highest respect as a genuine sympathizer with native feeling and aspirations, has issued a note in answer to Mr. Telang's note, in his capacity of chairman of the Rakhmabai Committee. It strikes us that the tone of the note betrays great sensitiveness in the learned principal and the way in which the educated Hindu youths is spoken clearly shows that the emotional and not the intellectual parts preponderated in the mind of the learned Principal when writing the note. After the expression of deliberate and confirmed opinion of the goodness and intellectual capacities of the educated Hindoo youths in his private and public statements, we fail to perceive that any thing has so precipitately brought the Hindu youth down as to make it contemptible in the eyes of *Mr.* Wordswoth. It is Mr. Telang's note that has irritated the venerable gentleman and his 'delusion' is now dispelled by that note alone. It is a thousand pities that the judgment of no less a person than Mr. Wordsworth should have been so readily warped into an expression of despair and despondency about the educated youth of India. And the reason of all this too, a mere difference of opinion between Mr. Telang and himself. But is there really any such radical difference as to justify the remarks of the learned Principal. Mr. Telang thinks that the efforts of the Committee should only be directed to seeking a change in the *kind* of penalties that are now attached to a refusal to obey a Civil decree ordering restitution of conjugal rights. He does not defend *Infant* Marriage and the virgin widow system now obtaining in this country. Educated and enlightened Hindu opinion has deprecated both and the perversity of the system is being daily impressed on the minds of the ignorant masses of the country. The inherent evil in both has been realized and a silent reform is going on throughout the length and breadth of the land to minimize it. But there is a point which some people are not agreed upon and that is as Dewan Bahadur Raghunath Raw puts it—a marriage without the consent of the couple is no marriage at all. Now this is a proposition that Mr. Telang objects to on the express ground that the condition of society in this country is not commensurate with an adoption of this element of consent into our marriage systems. Now this is quite irrespective of the merits or demerits of that cardinal and distinctive feature of the European marriage system; it is enough for Mr. Telang's purpose to have stated that the present generations of India at all events are not prepared to adopt into their marriage system the one element which has been so much belauded. Mr. Telang further states as his individual opinion that Hindu households are none the less happy for this want of consent. This is indeed, a point of difference between Mr. Telang and *those* who hold with the Dewan Bahadur that marriage *can* be no marriage if the parties have not consented. The strata of traditional beliefs in which he as a Hindu has been brought up has been crystallized into a solid opinion on account of his every day observance of the actual results of the Hindu system of marriages without consent, and as such Mr. Telang's opinion deserves great weight. Those who are born and bred up in a system of marriages by consent may have their own views on the necessity of this principle underlying any system that lays claim to be called a civilized system of marriages. But whatever *real* divergence of opinion there may be regarding this principle of consent, practical reformers will have always to consider whether any one principle to be newly introduced on account of its moral excellence or expediency does meet with the sympathies of the people and whether the people are *prepared* to embrace it? This has been universally admitted as a condition precedent to all Reform. And what shall we say when such an eminent professor of history and politics the great declaimer of all empirical methods and *a priori* arguments, is found to identify himself with the go-a-head reformers of educated India and to lose all patience at the expression of opinions contrary to his own?

The Rakhmabai case has been long before the public. It has been presented to the public from Dadaji's point of view and from Rakhmabai's point of view. The case has passed through successive stages, but we fancy the latest phase of the case-the formation of the Committee-has landed a gentleman like Mr. Wordsworth into position that may fairly be called antagonistic. There is a moral that may be drawn from all this; that when a man is born and bred up in a certain set of opinions comes across the opinions of those who hold the opposite, all the facilities which he has to observe and examine the latter and see to their fitness or otherwise are not sufficient safeguards against an improper judgment in favour of his own views. But we believe that Mr. Wordsworth is a person of good judgment and what he has written can only have been written in the heat of the moment. It is to be hoped that he will see his way to reconsider what he has been writing and rivet more firmly the bonds of sympathy between the educated Indian world and himself.

वेद शास्त्रांचे
परोजेत पाह दे

नोटीस,

रा० रा० गिरमा वल्दद चंद्रभान राहणार मळसुर यांस नोटीस देणार लक्ष्मण वल्लद उदाजी राहणार मरसुर तालुके बाळापुर नोटिसीनें असे कळवितो कीं तुह्मी घरखरचा करितां चार महिन्याच्या करारानें दर रुपयात एक पैसा व्याजाच्या करारानें घेऊन गेला त्यास आज अजमासे दोन वर्षे झाली आज पावतो रुपये आणून निकाल केला नाहीं. ह्मणून नोटीसीनें असें कळवितो कीं आठादिवसाचे आंत आणून निकाल करून रसीद घ्यावी असें न केल्यास रीतीप्रमाणें कोर्टात काम चालवून व्याज व मुदल व ह्या नोटीसीचा खर्च अखेर निकाल होईपर्यंत जो खर्च होईल तो सर्व तुमचे जवळून भरून घेतला जाईल. कळावें तारीख २९ माहे जून सन १८८७ इसवी.

सही

लक्ष्मण वल्लद उदाजी पाटील

राहणार मळसुर

## वऱ्हाड

हवामान:– हवेमध्यें उष्णता बरीच आहे गेले आठवड्यात पाऊस बराच पडला. माहामारिच्या योगानें सुमारे ८०-८५ मनुष्यें मांदी झाली त्यापैकीं अदमासे २०-२५ मनुष्ये मेलीं.

रा० रा० वासुदेव सदाशिव पितोळकर कमिशनर साहेबांचे क्लार्क आफ कोर्ट हे हैद्राबादेहून आफिशियेटिंग एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर होऊन इकडे आले आहेत. त्यांची नेमणूक अद्याप कोठें ती कायम केली नाहीं. उमरावती व आकोला या दोन ठिकाणीं असल्या कामदाराची सध्या फार जरूर आहे तेव्हां यापैकींच कोठेंतरी एका ठिकाणीं त्यांची नेमणूक होईल असा सुमार दिसत आहे. सध्या त्यांची स्वारी उमरावतीस आहे.

थोडे दिवसापासून घाटत असलेल्या प्रावडतमव व्याख्यान मालेचा उमरावतीस जुलई महिन्याच्या पहिल्या आदितवारपासून सुरवात होणार ह्मणून समजतें. व्याख्यान क्रमाचा प्रोग्रॅम अद्याप बाहेर तर आला नाहीं. कोणी ह्मणतात प्रति आठवड्यास एक होणार. मंडळीच्या सेक्रटरीचें काम तेथील एक वकील रा० रा० करंदीकर यांजकडे दिलेले आहे असें हा समजतें.

मेहरबान डायरेक्टर आफ पब्लीक इन्स्ट्रक्शन साहेब यांचीस्वारी रजेवरून परत येउन त्यांनीं तारीख २० रोजीं आपल्या जागेचा चार्ज घेतल्या कारणानें व रा. रा. लक्ष्मण कृष्ण चीपळुणकर बी. ए. हे ही वऱ्हाडांत आपल्या नौकरीवर हजर झाल्या कारणानें हायस्कुलांत व इतर कांहीं शाळांत खालीं लीहीलेले फेरफार केले आहेत.

अकोला हायस्कुलांत मे. एटकीन साहेब हे आपल्या हेडमास्तरच्या जागेवर परत आले. रा. रा. हरीरामचंद्र रोहणखेडकर हे आपल्या फर्स्ट असीस्टंटच्या जागेवर आले. रा. रा. गोपाळरामचंद्र पीटके यांना रा० रा० लक्ष्मणराव चिपळूणकर यांच्या सेकंड असिस्टंटच्या जागीं आक्टिंग नेमिले. खालच्या सर्व असिस्टंटची व्यवस्था पूर्वी प्रमाणेंच ठेविली.

उमरावती हायस्कुलांत बरेच फेरफार झाले. रा० रा० विसाजीपंत जोशी यांच्या जागेवर आजपर्यंत रा० रा० नारायण काशीनाथ दाते बी. ए. हे अक्टींग होते त्या जागीं रा. रा. लक्षमणराव चिपळूणकर यांस आक्टिंग नेमिले. रा० रा० दात्यांना अकोला हायस्कुलांतील फोर्थ आसिस्टंटची जागा रा० रा० वादेकर रेव्हेन्यु रीपोर्टरेंटमध्यें गेल्या कारणानें खाली होती तेथें कायम केले व उमरावती हायस्कुलांत आक्टिंग थर्ड आसिस्टंट नेमिले.

रा० रा० वीष्णु नारायण डांगे बी. ए. व रा० रा० सिताराम सदाशिव चितळे हे आजपर्यंत उमरावती हायस्कुलांत अनुक्रमे तिसऱ्या व चवथ्या असिस्टंटच्या जागेवर अकाटिंग होते ते अनुक्रमे आपापल्या चवथ्या व पांचव्या असिस्टंच्या जागेवर परत गेले—रा. रा. बालकृष्ण गोविंद सुळे तेथें अकटिंग पांचवे असिस्टंट होते त्यांना जळगांव अं. व्ह. स्कुलांतील फर्स्ट असिस्टंट चे जागीं नेमिलें.

मि. जे जी. मारीस, अ. कं. आणि माजिस्ट्रेट वर्ग १, खामगाव, यांस क्रिमिनल प्रोसिजर काड कालम १३३ (ए. २) १८५ (बी. ५) कलम १९१ (सी. ९.] कलम २६० (डा. १०) कलम ५२४ (इ. १२) यांत सांगितलेलें अधिकार मिळाले.

मि. रसूलखां सब असिस्टंठ कान्सरव्हेटर आफ फारेष्ट बुलठाणें, यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

सर्जन जे. जे. मोरान बुलठाणे येथील सिविल सर्जन यांची येथें बदली झाली व येथील सिविल सर्जन आपाथिकरी डी. कालेघन यांची बुलडाण्यास बदली झाली.

रा० रा० भीवराव अनंत यांस वाशमास तिसऱ्या वर्गाचे स्पेशल माजिस्त्रेट नेमले. हे व तेथील दुसरे स्पेशल माजिस्त्रेट सय्यदशहा अमदिल्ला कद्री यांचे बेंच बसून त्यांनीं वाशीम तालुक्यांतील तिसऱ्या वर्गांचे खटल्याचा निकाल ाव असें सरकारानें ठरविले आहे.

रा० रा० केशवराव जयकृष्ण ए. अ. क. यांस दोनें महिन्याची हक्काची रजा मिळाली.

उमरावतीस येथल्या प्रमाणेंच ज्युडिशल असिस्टन्ट कमिशनरचे कोर्ट होण्याचें ठरलें आहे. त्या जागीं सिकंदराबादचे क्याटोनमेंट म्याजिस्ट्रेट क्यापटन वॅारन होस्टिंग्ज यांस नेमलें असल्याचें टे० टा० पत्रावरून समजते.

रा. रा० निळकंठ नारायण भट यांनी रजेवरून परत येऊन येथील ट्रेनिंग कालेजचा चार्ज घेतला.

रा० रा० अर्जुनसिंग नायब तहशिलदार वणी हे रजेवरून परत आल्यावरून मि० रहिमतुल्ला यास खामगांवास नायब तहशिलदार नेमलें.

## वर्तमानसार.

नागपूरपासुन १९ कोसावर पल्डे गांवचे ग्रांमजोशाची बायको एका कुणब्यावर अतिलपट झाली होती. तिनें आपल्या प्रियकराबरोबर पाट लावुन घेतला.

ना० स०

किंग्स कालेजमध्यें प्रोफेसर लिओनी लेवी यांचें व्याख्यान झालें त्यांत त्यांणीं असें सांगितलें कीं सन १८६२ पासून सन १८८९ पर्यंत चोवीस वर्षांत हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांजकडे बिलायतेस १९,२०,००,०० पौंड पाठविण्यात २८ ५७,००,००० रु० लागले. यांच्या योगानें नुकत्या हुंडीच्या भावामुळें ३,३०,००,००० पौंड म्हणजे ३३ कोटी रुपयाचें नुकसान झालें. त्यांत देखील गेल्या दहावर्षास २९ कोटीचें व त्याच्या मागच्या चवदा वर्षांत ४ कोटीचें नुकसान झालें. हिंदुस्थान सर्व प्रकारें परतंत्र होऊन असंत संकटांत पडलें आहे. ही इंग्लंडची सारखी तुंबडी हिंदुस्थानाच्यानें किती दिवस भरण्याचें निभावेल कोण जाणे. आज जरी इंग्लंडास सधन होत आहेंसें वाटतें; परंतु परिणामीं हे सर्व निचरेल. प्रत्यक्ष रीतीनें इंग्लंडास याचा झाडा द्यावा लागेल. अविचाराचा उधळपट्टीचा व अन्यायाचा प्रकार फार दिवस निभावत नाहीं. आंतून इंग्लिश राज्याची स्थिति नीट नाहीं पुढें मागें रशियाशीं लढण्याचा प्रसंग इंग्लंडास येणारच. त्या प्रसंगीं इंग्लंडास आपल्या शत्रूच्या व देशाच्या संरक्षणार्थ सर्वस्व वेंचावें लागेल. कारण त्यास कोणीकडूनही मदत मिळण्याचा संभव नाहीं. हिंदुस्थानांतून मदत व्हावयाची तर त्यास अगोदर इंग्लंड निःसत्व व निरुपयोगी करून ठेवीत आहे. ऐरलंड तर अशा प्रसंगीं इंग्लंडच्या हल्लींच्या वर्तनावरून उरावर बसावयास तयार होईल असें दिसतें. तेव्हां इंग्लंडानें अशा समयीं नीट विचार करून पुढचा परिणाम पूर्णपणें मनांत आणून ऐरलंड व हिंदुस्थान यांची स्थिति सुधारून आपला कार्यभाग साधून घ्यावा यांत शहाणपणा आहे. हिंदुस्थानाविषयीं मात्र इंग्लंडानें सावध होऊन लवकर योग्य बंदोबस्त केला पाहिजे. प्रजेचा संबंध राज्यकारभार व्यवस्थेंत त्यांच्या तर्फेचे मुखत्यार नेऊन जोडला पाहिजे. पैशाच्या गैर व्यवस्थेंत हिंदुस्थानच्या लोकांचें मत असणें अगदीं अवश्य आहे आमच्या कांग्रेसांनीं सूचना केली ती फार चांगली व दोनही देशांस सोयकर आहे. हिंदुस्थानास एकदम रसातळास पोंचविण्यांत त्यांचें हित नाहीं. हिंदुस्थान सुखी व श्रीमान होऊन इंग्लंडास पुष्कळ दिवसपर्यंत लाभ होत रहावा हे अधिक श्रेयस्कर आहे. तर याचा विचार इंग्लंडचे लोक करतील व आमचे लोक उद्योग करून त्यांचे कान उघडणी करून विचार करावयास लावितील अशी आम्ही आशा करितो.

— जर्मन सरकारानें विमानांतून लढणारी एक पलटण तयार करण्याचा विचार केला असें पाहून फ्रेंच सरकारानें ही विमानांतून लढणारी एक पलटण तयार करण्याचा हुकूम फर्माविल्याचें समजतें.

— युनाटेड स्टेटसमध्यें चिकागो येथें मि० एल. एच. थामस या नांवाच्या गृहस्थानें कागदाची बाटली करण्याची युक्ति काढली आहे त्यांत पातळ पदार्थही ठेवतां येतो असें ह्मणतात.

— खारासान प्रांतीं दुष्काळ पडण्याची चिन्हें दिसत आहेत.

— काश्मीरच्या महाराजा सभोंवती पहारा असून महाराजास आपल्या मित्रांस ही भेटण्याची परवानगी मिळत नाहीं अशी वदंता आहे.

— महाराणी साहेबांस जुबिलीसंबंधानें जे नजराणे आले आहेत त्यांत स्टाफर्ड येथून ९० बुटांचे जोडे आले आहेत हाक्सन येथील कांहीं लोक गाढव नजर पाठविणार आहेत असें ह्मणतात.

— फ्रेंच लोकांनीं आपल्या जंगल खात्यांतील एक अधिकारी हिंदुस्थानाच्या जंगल संबंधाची माहिती करून घेण्यासाठीं पाठविला आहे तो लवकरच इकडे येऊन दाखल होईल.

— चंबा संस्थानाचे वारस सचेतसिंग हे हल्लीं महाराज धुलिपसिंग यांजपाशीं रशियांत आहेत असें ह्मणतात.

— थोड्या दिवसांपूर्वी वेल्सच्या कांहीं भागांत शाई प्रमाणें काळ्या रंगाचा पाऊस पडला.

— वानरें खडकांतून कालवें फोडून काढून खातात असें ह्मणतात.

— सरजान लारेन्स नांवाची आगबोट बुडाल्यामुळें कलकत्ता शहरांतील कोणाचे दूरचे कोणाचे जवळचे असें नातलग नाहींसे झाल्यामुळें सर्व शहर शोकग्रस्त झालें आहे असें इंग्लिशमन पत्रावरून समजतें.

— तुर्कस्थानांत व्हर्ना येथें ता० ९ रोजीं धरणिकंपाचे धक्के बसून सर्व शहर नाश पावलें व बरीच मनुष्यें मेलीं.

— पुष्कळ रशियन लोकें वेषांतर करून हिंदुस्थानांत येण्यास निघाले व त्यापैकीं सरहद्द ओलांडून देशांत शिरले आहेत अशी पेशावर येथें वदंता आहे.

सु० प०

लग्न झालेल्या हिंदु उमेदवारास परीक्षेस घेऊं नये व त्यास चाकरी देऊं नये या प्रश्नाचें उत्तर देतांना एक साहेब ह्मणतात, हिंदूस जर हा नियम लागू करावयाचा तर लग्न न झालेल्या युरोपियनास, पुष्कळ दां लग्न करणाऱ्या मुसलमानांस व कोणत्याही प्रकारचा मनुष्य लग्नसंबंधीं हक्क बरोबर राखीत नसेल तर त्यालाही हे नियम लागू केले पाहिजेत. शाबास! युरोपियन होऊन आमच्या सुधारकांचे चांगले दांत पाडलेस!

हिंदुस्थान हें इंग्लंडचें अन्नदातें आहे कारण इंग्रज लोक १० कोट रुपये दरसाल पगाराच्या रूपानें नेतात, ८ कोटी पेनशन च्या रूपानें नेतात, इंग्रजी फौज इकडे पोसली जाते, इंग्रजी व्यापारी इकडच्याच पैशावर पोट भरतात, इंग्रजी दलालांचें हिंदुस्थानावरच चालतें, चाहा कापी वगैरे इकडूनच पुरविलें जातें. एकंदरींत इंग्रजांचा जीव हिंदुस्थान असून शिवाय इंग्लंड करितां तें प्राण देण्यासही तयार असतां इंग्रज लोक त्याचा मोबदला या देशास कांहीं देत नाहींत असें एक पत्रकर्ता ह्मणतो.

गेल्या आठवड्यांत एके दिवशीं रात्रीं बंगाल नागपूर रेलवे कडील त्यापटला नांवाचा [illegible] र दारू पिऊन उन्मत्त झाला, व शंटिंग होत असतांना त्यानें बेफाम पणानें इंजिन चालविलें. तेव्हां पोर्टरानें त्यास लाल बाहुटा दाखविला. त्या बरोबर ही स्वारी संतप्त होऊन त्यांनीं पोर्टरास गाडींतील कोळसे फेकून मारण्याचा सपाटा चालविला. तेव्हां तो बिचारा पळून गेला व त्यानें अशी. स्टेशनमास्तराला वर्दी दिली त्यांनीं येऊन डायव्हरास ताकीद केली तरी तो ऐकेना, तेव्हां त्यांनीं त्यास पोलिसच्या ताब्यात दिलें. हल्लीं मि. डे. क. साहेबापुढें त्या मनुष्यावर मुकद्दमा चालू असून त्यास बहुशः शिक्षा होण्याचा संभव दिसतो.

त्या डायव्हराला ज्या दिवशीं कैद केलें त्याच दिवशीं त्याचा सोबती एक दुसरा युरोपियन आपल्या मित्राचा सूड घेण्याकरितां असि. स्टेशन मास्तरावर गोळी घालण्याकरितां भरलेली बंदूक खांद्यावर घेऊन स्टेशन कांपौन्डांत हिंडत होता. पोलिस त्याला पकडण्याच्या प्रयत्नांत होते, पण त्याच्या जवळ जाण्याची कोणास छाती होईना. असि. स्टेशन मास्तर तर त्या रात्रीं अगदीं घाबरून गेले होते. त्यांनीं सारी रात्र कोणास माहीत नाहीं अशा एक डब्यांत निजून घालविली. शेवटीं त्या इसमास चीफ कान्स्टेबल ? टर्नर ह्यानीं पकडलें. त्याच्यावर खटला चालू होता व त्यास १६ दिवस कैद व २० रु० दंडाची शिक्षा झाली.

मद्रासइन्कमट्याक्स कलेक्टरचा फाजील पणा—ह्या अधिकाऱ्यांनीं गोव्या दिमाखीनें तेथील पत्रकर्त्यांला लिहिलें कीं, तुमचे बातमीदार ( contributors ) किती आहेत, व त्या प्रत्येकाला तुह्मी पगार काय काय देतां, याची एक यादी करून आपचे हपिसांत पाठवावी, ह्मणजे त्यांच्यावरील कराचा आकारणी करण्याला आम्हांला ठीक पडेल. त्या पत्रकर्त्यानें ती यादी देण्याची नाकबूल केली. त्या अधिकाऱ्यांनीं सरकारांत रिपोर्ट केला. मद्रास सरकारानें ठरविलें कीं लोकांचें खासगी उत्पन्न किती आहे, तें पहाण्याकरितां वर्तमानपत्रकर्त्यांची मदत घेण्याचा सदर्हु अधिकाऱ्यांनीं प्रयत्न केला, हा मोठा अन्याय केला. वर्तमानपत्रकर्ते आपल्या बातमीदारांचीं नांवें देऊं लागले, तर तो मोठा विश्वासघात होणार आहे. सरकारांतून अशी थप्पड मिळाली, तेव्हा हे राजेश्री चुरमुरे फकीत बसले.

जिवंत केला—वऱ्हाडांतील एक मारवाडी नाशीक येथें यात्रेकरितां आला होता त्याचा तनसुक या नांवाचा अकरा बारा वर्षांचे वयाचा मुलगा गल्या रविवारीं सकाळीं येथील गंगेंत बुडाला व त्यास दहा वेळां गंगेतून बाहेर काढला, त्या वेळीं तो जिवंत होईल अशी मुळींच आशा नव्हती. पुढें त्यास येथील हस्पितळांत नेला, तेथें त्यास हल्लींचे येथील आक्टिंग अ० सिव्हिलसर्जन डाक्टर मि. कासम विरजी पटेल यांणीं त्याचे अंगास बरेंच ठिकाणीं टोंचून व त्यांत उन्हून पाण्याच्या पिचकाऱ्या वगैरे मारून, व शिवाय दुसरे बरेंच औषधोपचार चालू केले, त्या योगानें तनसुक हा रात्रीं अकरा वाजतां शुद्धीवर आला व दुसरे दिवशीं सकाळीं त्याची प्रकृति उत्तम होऊन त्यास त्याचे बापाचे हवालीं केला. तनसुक याचे बापानें त्याचें ऐपतीप्रमाणें डाक्टर मि० कासम विरजी पटेल यांस २५ रुपये बक्षीस देण्यास काढले होतें, परंतु ते त्यांणीं न घेतां परत केले, व त्यांणीं सांगितलें कीं, यांत मी आपलें कर्तव्य केलें आहे, विशेष कांहींएक केलें नाहीं त्याबद्दल मी बक्षीस कांहींएक घेणार नाहीं. सदरचे सर्व कृत्याबद्दल डाक्टर मि० कासम विरजी पटेल यांची आह्मी फारच वाखाणणी करतों. सदरचे डाक्टर हे सुस्वभावी व आपलें कामांत फारच निष्णात आहेत. पु० वै०

विलायत सरकाचे हुकूमावरून व्हाइसराय साहेबांनीं मुद्दाम दरबार भरविला होता कंदाहार पर्यंत होईल तितक्या त्वरेनें रेल्वे बांधण्या करितां डायरेक्टर जनरल यांस हुकुम होऊन रवाना होणारे सैन्याची रसद नें तनवीज करण्यास्तव क्वेटास जाण्यास तारेनें हुकूम केला. युद्धसामग्री जय्यत असण्याबद्दल हुकुम सुटले. सरहद्दीवर जाणारे सैन्यासाठीं अन्न सामुग्रीही भरपूर तयार ठेवण्या बद्दल गव्हर्नर जनरल साहेबांनीं त्या खात्यास हुकूम पाठविले. पेशावर पासून जमरूड पर्यंत होणार रेल्वे करितां एक इंजिनियर मागविला. हें सर्व रशियानें चाल करून सरहद्द ओलांडली ह्मणून.

बंगाल युनिव्हर्सिटीचे राजिस्टरावर कांहीं आरोप आल्या वरून त्यास सिंडीकेटनें सास्पेंड केलें आहे.

नवे ठग—चौघे ठकांनीं गर येथील सोन्याच्या बाजारांत एकादुकानीं जाऊन आठ तोळे सोनें मागितलें व त्या सोनेवाल्यास रुपये १५१ची पोटळी दिली तो तेवढ्यानें किंमत भरेना, ह्मणून त्यानीं असा बहाणा केला कीं, सोन्याचा दर आह्मांला फार जबर पडत आहे. हें ऐकून सोनेवाल्यानें रुपये परत देऊन सोनें परत घेतले, ह्मणजे त्यास सात तोळे सोनें मिळाले व त्याने पाहिल्या रुपयाची पोटळी दुकानदाराचे स्वाधीन करून आह्मी सोन्याचा हिशेब करून येतों असें सांगून ते निघून गेले ते परत आले नाहींत. दुकानदारानें मागून रुपयाची पोटळी सोडून बघतली तों आंत फक्त पैसेच निघाले!!! या प्रकरणांत तीन तीन माहिन्यांची सजा झाली.

नवी व्याधि —कोळशा पासून कांहीं एक प्रकारचा ग्यास निघून त्या पासून वशामध्यें कांहीं रोग होतो असें ह्मणतात.

इं० प्र०

नवें यंत्र—तोफखाना वाहून नेण्याकरितां एक नव्याच प्रकारचें बहाच्चगेअस सिगर आणि कंपनी यांनीं काढिलें आहे. यांत चार अश्वांचा व दारू गोळ्याचे सामानाचे गाडीचा समावेश होतो. याला दहा घोडे एकापुढें एक न जोडतां एकमेकांचे बाजूला जोडावयाचे आहेत. याचे उपयोगाची व सोईवारपणाची प्रचिती विलायतेचे लष्करी कामदार पाहणार आहेत. न्या०

☞ हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत [illegible] खंडेराव फडके यांनीं छा० प्र०